


फ्रेंच कादंबरीकार अलेक्झांडर ड्यूमा याच्या Twenty Years After कादंबरीची ही सारांशकथा. ड्यूमाच्या 'तीन शिलेदार' या कादंबरीचा आस्वाद घेता यावा म्हणून ती सारांशरूपाने यापूर्वी सादर केली. त्याच कादंबरीची ही दुसरी पुढची कथा. या कथेत इंग्लिश राज्यक्रांतीचा भाग आला आहे.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या घटनेला जागतिक इतिहासात महत्व आले. राजेशाही व सरंजामदारीचे वातावरण लोकेच्छेपासून विलग होत चालले होते. अशा परिस्थितीत चाललेल्या राजकीय घडामोडी या कथानकात ललित स्वरूपात ड्यूमाने नोंदल्या आहेत.

'तीन शिलेदार' कथेतील प्रसंगाना आता वीस वर्षे होऊन गेली आहेत. डार्टा आता पंचेचाळीस वर्षांचा झाला आहे. त्याची उमेद, तडफ मात्र तीच कायम आहे. फ्रान्सचा राजा १३वा लुई मरून गेला, त्याचा महत्वाकांक्षी प्रधान रिचल्यूही मरण पावला. फ्रान्सवर ॲन राज्य करीत आहे, राजपुत्र १४वा लुई अल्पवयी आहे व रिचल्यूची जागा 'माझारीन' या कद्रू इटालियन मनुष्याने घेतली आहे. गरीब प्रजेला नाडून तो आपली तुंबडी भरीत आहे; आणि यामुळे जनता त्याला व राणीला शिव्याशाप देत आहे. प्रजापक्षाचे वजन दिवसेंदिवस वाढीला लागत असून त्याचे नेतृत्व काँड नावाच्या व्यक्तीकडे आहे. डार्टाचा पूर्वीचा शत्रू रोशफोर या पक्षाला मिळाला आहे. राजपक्षाचे बळ दिवसेंदिवस कमी होऊ लागले आहे.

अशा धामधुमीच्या काळात या कथानकाला सुरुवात होत आहे.

*दत्त आपटे यांनी संक्षिप्त अनुवाद केलेले, त्यांच्याच पत्नी उषा आपटे यांच्या नावावर प्रसिद्ध केलेले ड्यूमाच्या मालिकेतील हे पुस्तक मुंबईच्या ढवळे प्रकाशकांच्या वतीने 'पाश्चात्य वाङ्मय परिचय'मालेत ९ वे पुष्प म्हणून १९५२ साली प्रसिद्ध केले. दत्त आपटे यांच्या निर्वाणा(१९८२)नंतर १९८६ला त्याची २री आवृत्ती निघाली.*

| | **प्रकरण** | **पृष्ठ** |
|---|---|---|
| १ | धनी आणि नोकर | १३९ |
| २ | गाठ पडे ठका ठका! | १४१ |
| ३ | राजकीय कैदी | १४४ |
| ४ | इंग्लंडची दुर्दैवी राणी | १४६ |
| ५ | एक जुनी हकिकत | १४८ |
| ६ | डार्टाची हिकमत | १५० |
| ७ | इंग्लंडचा दुर्दैवी राजा | १५१ |
| ८ | मोर्डाच्या हातावर तुरी | १५४ |
| ९ | चार्लस्‌ची फाशी | १५६ |
| १० | धडाड् धूम! | १५८ |
| ११ | डार्टाची अटक आणि ऑथाची फसगत | १६१ |
| १२ | सुटका! | १६४ |
| १३ | राणीची सही व लोकपक्षाचा विजय | १६७ |




# वीस वर्षांनंतर

## १. धनी आणि नोकर

ठो ऽऽ ठोऽऽऽ बंदुकीचे बार ऐकू आले. ''माझारीनचा धिक्कार असो'' ही आरोळी पण माझारीनच्या कानी आली. तो आपल्या वाड्यात माडीवर एकांतात बसला होता. प्रजेत वाढलेल्या असंतोषाचा निदर्शक असा कोलाहल ऐकून तो पुटपुटला, ''मी इटालियन म्हणून हे नीच लोक माझा द्वेष करतात, दुसरं काय? पण माझं हे काय वाकडं करणार आहेत?'' त्याने एकदा आपल्या द्रव्यसंग्रहाकडे नजर टाकली. ''या कद्रूने गिळंकृत केलेला पैसा त्याचं पोट फोडून बाहेर काढा!'' कोणातरी माथेफिरूचे हे शब्द सरळ त्याच्या कानांवर येऊन आदळले व फिरून त्याने भेदरलेल्या नजरेने एकदा आपल्या तिजोरीकडे पाहिले. माझारीनला प्राणांपेक्षाही ही तिजोरी प्यार होती.

ठण् ठण्.... त्याच्या समोरील प्रचंड घड्याळात दहाचे ठोके पडताच तो दचकला. ''बोर्नोई! बोर्नोई!!'' त्याने आपल्या खाजगी कारभाऱ्याला हाक मारली. तत्काळ काळ्या पोशाखातील एक व्यक्ती त्याच्या पुढे येऊन उभी राहिली.

''बोर्नोई, आज वाड्यात कोणते शिलेदार हजर आहेत?''

''डार्टाच्या आधिपत्याखालील शिलेदार आहेत, महाराज!''

''मान्सीर डार्टा इथे आहे काय?''

''आहे महाराज!''

''जा, त्याला पाठवून दे पाहू.''

डार्टा आत येताच माझारीन म्हणाला, ''डार्टा, तुम्ही मोठे शूर व इमानी आहात, असा मी तुमचा लौकिक आजपर्यंत ऐकत आलो आहे.''

''आज या चिकट्याचं काही तरी काम दिसतं आहे.'' डार्टा मनाशी म्हणाला व मग माझारीनला लवून मुजरा करून तो म्हणतो, ''माझी गरिबाची कामगिरी महाराजांच्या लक्षात आली हे मी माझं भाग्य समजतो.''

''तुम्ही पूर्वी राणीची एक मोठी महत्वाची कामगिरी पार पाडली आहे असं मी ऐकतो. आज तुम्ही माझी एक तितकीच महत्वाची कामगिरी पार पाडायची आहे. पाहू तुमचं कसब!''

''पाहावीच महाराजांनी एकदा या सेवकाची करामत!'' डार्टा नम्रपणे उत्तरला.

''राणीची कामगिरी तुम्ही आणि तुमच्या स्नेह्यांनी मिळून पार पाडली, नाही? तुमचे ते दोस्त हल्ली कुठे असतात?''

''राणीची कामगिरी! स्नेही!!'' डार्टा मुद्रेवर शक्य तेवढे आश्चर्य आणून म्हणतो, ''महाराज, आपण काय म्हणता त्याची मला काहीच कल्पना येत नाही.''

''डार्टा, या लपवालपवीचा काही उपयोग नाही. आपले उरलेले तीन स्नेही कुठे आहेत? मला सर्व काही माहीत आहे. आपल्या टाळाटाळीचा काही एक उपयोग नाही.''

''तरुण वयात तीनच काय पण भेटतील तितक्या व्यक्ती मित्र होऊ शकतात महाराज!''

''मान्सीर डार्टा, राणीला भिऊन ही गोष्ट लपवायचं तुम्हाला मुळीच कारण नाही. राणीने तुमच्या कामगिरीबद्दल तुम्हाला बक्षीस दिलेली व तुम्ही विकून टाकलेली अंगठी आज माझ्या हाती आहे. एवढी माहिती दिल्यानंतर आपण आता जास्त आढे वेढे घेणार नाही अशी आशा आहे.''

''महाराज, माझ्या जुन्या मित्रांचा नक्की पत्ता मला माहीत नाही, पण आपली इच्छाच असेल तर त्या दृष्टीने मी काही प्रयत्न करून पाहीन.'' माझारीनच्या भाषणाने विरघळलेला डार्टा म्हणाला.

''मग करा सुरुवात. तुमची पहिली कामगिरी हीच!''

''त्यांना हुडकण्यासाठी कदाचित् सारा फ्रान्स पालथा घालावा लागेल आणि या घटकेला मजजवळ फुटकी कवडीही नाही.'' डार्टा कुरकुरला. या निमित्ताने माझारीनला काही गंडा घालता आल्यास तो पाहात होता.

''एवढंच ना! ही घ्या थैली!!'' डार्टाने थैली हस्तगत केली व माझारीनची रजा घेऊन तो खाली चौकात आला. चौकातील दिव्याच्या उजेडात थैली सोडून त्याने आतील पैसे मोजून पाहिले. ते फक्त शंभर पिस्टोल होते. ''या शंभर चांदीच्या तुकड्यांवर हा चिक्कू मला राबवू पाहात आहे काय? ठीक! नाही होणार म्हणावे बेट्याला.'' डार्टा स्वगत पुटपुटला व आपल्या वसतीस्थानाकडे निघाला. डार्टा आपल्या पथिकाश्रमाशी येऊन पोचला त्यावेळी तेथे लोकांची एकच गर्दी उसळलेली त्याला दिसून आली. या गर्दीत सरकारी शिपायांचा बराच भरणार असल्याने डार्टाची उत्सुकता विशेष वाढली. सरकारी पहाऱ्यातून चाललेल्या एका गाडीवर लोकांनी हल्ला चढविला व या दंगेखोरांचा पुढारी येथेच कोठेतरी दडून बसला आहे, अशी माहिती त्याला मिळाली. रात्र बरीच झाली असल्याने विशेष पंचाईत न करता डार्टाने आपली खोली गाठली. खाणावळबाईला आपले भोजन व दिवा वर खोलीतच पाठवून द्यायला त्याने सांगितले.

मेणबत्तीच्या मंद प्रकाशात त्याने आपल्या सर्व जुन्या कागदपत्रांची उलथापालथ करून पाहिली, पण त्याच्या मित्रमंडळींचा पत्ता सांगणारे एकही चिटोरे अगर पत्र त्यात निघाले नाही, तेव्हा मोठ्या निराश मनाने त्याने भोजनाला आरंभ केला आणि अगदी याच क्षणाला खोलीच्या खिडकीतून एक डोके आत आले.

''अरे चोरा! माझ्या शंभर पिस्टोलवर तुझी नजर आहे, होय?'' चोरून डोकावणाऱ्या त्या व्यक्तीची मानगूट पकडून डार्टा ओरडला.

''महाराज, गरिबावर दया करा. निदान माझं म्हणणं तरी ऐकून घ्या!'' ती व्यक्ती गयावया करून म्हणाली.

''कोण प्लाँशे? अरे लेका! आणि हा काय धंदा चालवला आहेस?'' डार्टा त्या व्यक्तीची मानगूट सोडून ओरडला.

आपणाला आपल्या जुन्या धन्यानेच पकडलेले पाहून प्लाँशेला अत्यंत आनंद झाला.

''महाराज....''

''लेका रात्रीच्या वेळी असा चोरून लोकांच्या खोल्यांतून डोकावीत का निघाला आहेस?''

''महाराज, रोशफोर आपला जुना वैरी आता लोकांचा पुढारी आहे. त्याला आताच आम्ही सरकारी पहाऱ्यातून सोडवलं पण शिपायांचा माझ्यावर दात असल्याने मी इथे माळ्यावर दडून बसलो होतो.''

''मूर्खा, सरकारी लोकांच्या हाती लागलास तर तुझी चटणी उडेल आणि माझी नोकरी जाईल. बरं, खा दोन घास इथे माझ्याबरोबरच. मग पाहू काय करायचं ते.'' प्लाँशे भुकेलेला होताच. त्याने अन्नावर यथास्थित तोंडसुख घ्यायला सुरुवात केली.

''काय रे प्लाँशे, तू तर आता पुढारी झालास, पण माझ्या जुन्या स्नेह्यांपैकी तुला कोणी कधी भेटले होते का?''

''नाही महाराज. पण अरामीचा नोकर बेंझी मात्र इथल्या मठात चोपदार आहे, तो मला नेहमी भेटतो. त्याला अरामीचा पत्ता नक्की माहीत असेल.''

डार्टा आपले कपडे घालून बाहेर जायला सज्ज झाल्याचे पाहून प्लाँशेची गाळण उडाली. तो गयावया करून म्हणाला, ''महाराज, मला असाच एकट्याला सोडून तुम्ही जाणार?''

''बेट्या, चिंता करू नकोस. माझी खाणावळवाली मॉडेली बाई मोठी विश्वासू आहे; ती तुला दगा देणार नाही. खुशाल आराम कर. मी तिला सांगून जात आहे.''

●●●

## २. गाठ पडे ठका ठका!

प्लाँशेने सांगितलेला मठ हां हां म्हणता डार्टाने गाठला. मठातील धार्मिक कार्यक्रम नुकताच आटोपला होता व भाविक लोकांची पांगापांग सुरू होती.

''या बेट्या जेजुइटांना प्रार्थनेशिवाय काही दिसतच नाही,'' इतक्या अपरात्री प्रार्थनामंदिरातील ती वर्दळ पाहून डार्टा चडफडला. इतक्यात मठाच्या चोपदाराकडे त्याचे लक्ष गेले. खरोखरच तो बेंझी होता. आपल्या डगल्याच्या व रुप्याच्या काठीच्या जोरातच तो होता.

''शूऽऽशूऽऽऽ'' त्याच्या डगल्याचे टोक ओढून डार्टा म्हणाला.

''कोण? मान्सीर डार्टा?.... अरे देवा!'' काहीतरी घातपात झाल्याप्रमाणे बेंझी विव्हळला.

''जुन्या दोस्ताचं स्वागत करण्याची ही कुठली तऱ्हा बेंझी?'' डार्टा हसून म्हणाला.

''जो आपल्याला मुक्ती मिळवून देण्याला मदत करतो तोच खरा मित्र, आपल्या भोवतालचे पाश वाढवितो तो नव्हे!'' इरसाल ख्रिस्तभक्ताप्रमाणे बेंझी उद्गारला. बेंझीकडे डार्टाचे काही काम नसते तर या उद्गारांबद्दल त्या ढोंगी चोपदाराची बत्तीशी त्याने केव्हाच सैल केली असती. पण आता त्याला गप्प बसणे भाग होते.

''जाऊ दे रे बेंझी! मी तुझ्या मुक्तीच्या आड येत नाही, पण तुझा धनी कुठे आहे ते तरी सांगशील!''

''आपल्या उचापतीमुळे त्यांचीही मुक्ती जायची, त्यांचा पत्ता मला माहीत नाही हे एक प्रकारे बरंच झालं म्हणायचं!''

बेंझीचे प्रकरण लेचेपेचे नाही हे डार्टाने तत्काळ ओळखले. हा बगळा सरळ मार्गाने हार जात नाही एवढे कळताच डार्टाने दुसरा उपाय काढला. त्याच्या मुठीत काही नाणी कोंबीत तो म्हणतो, ''अरे, जुना स्नेही म्हणून मला त्याला भेटायचं आहे, माझं त्याच्याशी दुसरं काही काम नाही.''

बेंझी पुरा खट होता. त्याने ती नाणी झिडकारून टाकली आणि सरळ आपल्या खोलीचा रस्ता धरला.

डार्टा पुरा चाट झाला. ''अरे लुच्च्या ठका!'' तो पुटपुटला.

डार्टा हळूच तेथेच छपून बसला. बेंझीचा पुरा पिच्छा पुरविण्याचा त्याचा निश्चय झाला होता.

थोड्याच वेळात बेंझी खोलीतून बाहेर पडला व आपणावर कोणाची पाळत आहे की काय याचा कानोसा घेत मठाबाहेर पडला. डार्टाने त्याला शंका न येईल अशा बेताने त्याचा पाठलाग सुरू केला.

थोड्याच वेळात बेंझीने एका तबेल्यापाशी येऊन एक घोडा भाड्याने घेऊन प्रयाण केले. तो जाताच डार्टा त्या तबेल्यापाशी आला व तेथील पोऱ्याला त्याने विचारले, ''हा चोपदार कुठे गेला रे आता?''

''नाईसला गेला.''

''नाईसला काय मठबीठ आहे काय एखादा?''

''अहो, जेजुइटांचा प्रसिद्ध मोठा मठ तिथेच आहे ना!''

''असं का!'' एवढेच म्हणून डार्टा तेथून निसटला. अरामीला आपण आता खास गाठू शकू असे त्याला वाटू लागले.

नाईसला रात्रीच पोचणे श्रेयस्कर वाटल्याने दुसऱ्या दिवशी सायंकाळी डार्टाने प्लाँशेसह पॅरीस सोडून नाईसच्या दिशेने आपले घोडे दवडले. या खेड्यात वस्ती अशी फारशी नव्हतीच. मुख्य मठाच्या भोवताली जी काय चार घरे दिसत होती तेवढीच.

''प्लाँशे, नीट लक्ष ठेव. हा बेंझ्या रोज रात्री इथे आपल्या धन्याकडे येत असला पाहिजे.'' डार्टा म्हणाला.

इतक्यात त्यांना घोड्याच्या टापा ऐकू आल्याने ते दोघेही तेथेच एका घराच्या आडोशाला उभे राहिले.

''बेंझीच तो!'' घोड्यावरून येणाऱ्या व्यक्तीला अंधारातून शक्य तितके निरखीत प्लाँशे पुटपुटला.

''अरे ढोंग्या, आता पाहातो तुझा धनी कसा सापडत नाही ते!'' डार्टा म्हणाला.

बेंझीने एका घरापुढे आपला घोडा उभा केला व खाली उडी टाकली. डार्टाने तत्काळ त्याची मानगूट पकडली. ''मेरे प्यारे दोस्त, आता खोटं बोलून तुझं काही चालणार नाही.''

''धर्माच्या कार्यासाठी, खोटं बोलणं हेही पुण्यच आहे.'' बेंझी निर्लज्जपणे म्हणाला.

''बस्स कर तुझी बडबड!'' डार्टा त्याच्यावर खेकसला, ''अरामी! अरामी!!''

''ओऽहो! मान्सीर डार्टा! तू नि इतक्या अपरात्री इथे कुठे?'' अरामी दार उघडून बाहेर येता येता म्हणाला.

''तुझा हा लुच्चा नोकर काही थांगपत्ता लागू देत नव्हता. पण म्हटलं घ्यावीच तुझी एकदा गाठ!''

''भल्या गृहस्था, आत तरी ये. मग बसू खुशाल गप्पा मारीत.''

सर्व मंडळी आत आली. घरातील एकंदर थाटमाट पाहून डार्टा थंडच झाला. अरामी म्हणजे एक बडे प्रस्थ झाले असावे अशी त्याची खात्री झाली.

''निव्वळ धर्मोपदेशक म्हणून तू ही पुंजी गोळा केलीस?'' न राहवल्यामुळे डार्टाने विचारले.

''बाबा, ही प्रत्येकाची खाजगी रहस्यं आहेत....हाऽ हाऽऽ'' अरामी हसून म्हणाला.

''बरं, जाऊ दे ते. मी आज एका विशेष कामासाठी आलो आहे. माझारीनच्या मनात आपणाला काही कामगिरी सांगायची आहे. मला वाटतं ती पार पाडली तर आपला बराच फायदा होईल.''

''नाही रे बाबा मी या भानगडीत आता पडणार! माझा धर्मोपदेशकाचा पेशा आहे तो ठीक आहे. याशिवाय सध्या राजकारणात दुफळी आहे. माझारीन व राणी एका बाजूला, तर अल्पवयी राजपुत्राला ताब्यात घेऊन या दुकलीचं उच्चाटण करायला टपलेल्या काँडचा पक्ष एका बाजूला. असंतुष्ट जनतेचंही पाठबळ त्यालाच. अशा स्थितीत मी या भानगडीत पडायला मुळीच तयार नाही.''

''म्हणजे तू माझारीनला साहाय्य करायला तयार नाहीस?'' डार्टा निराशेने म्हणाला.

''नाही बुवा, आणि मला असं वाटतं की तूही या फंदात पडू नयेस. तुला स्वस्थ राहावतच नसेल तर काँडलाच काही मदत करता आली तर पाहा!''

'अरे लुच्च्या! एकंदरीत तू काँड पक्षात आहेस तर! म्हणून ही टोलवाटोलवी काय?' डार्टा मनाशी म्हणाला.

''बरं. पार्थाची वार्ता काय?'' तो विचारतो.

''तो तर आता बडा जमीनदार होऊन बसला आहे. तो पिकार्डला असतो.''

''वाऽऽ मला त्याला भेटायचं आहे. बरं मग घेतो रजा.''

दोघाही मित्रांनी परस्परांचा हात प्रेमाने दाबला. थोड्याच वेळात डार्टा व प्लाँशे यांचे घोडे पिकार्डच्या दिशेने दौडत निघाले.

उजाडता उजाडता पिकार्डच्या भव्य किल्ल्यापाशी ते आले.

''ओऽ होऽऽ हा किल्ला जर पार्थाच्या मालकीचा असेल तर मोठीच मौज झाली म्हणायची!'' प्लाँशे ओरडला.

''चूप बस मूर्खा! पार्था पार्था काय म्हणतोस? तो आता मोठा सरदार झालेला दिसतोय.''

इतक्यात एक घोडेस्वार त्यांच्या दृष्टीला पडला. त्याच्या भोवती शेतकऱ्यांचा गराडा पडला असून ते त्याच्याशी मोठ्या अदबीने बोलत होते.

''हा पार्था तर नसेल?'' डार्टा हळूच म्हणाला.

''शक्य नाही, पार्थाची भव्य शरीरयष्टी कुणीकडे आणि हा खुजा कुणीकडे!'' प्लाँशे उत्तरला.

''ओऽ हो! महाराज, हा तर पार्थाचा नोकर माझा दोस्त मास्कटाँ!'' प्लाँशे आनंदातिशयाने ओरडला. प्लाँशेचे हे उद्गार स्वाभाविकच घोड्यावर बसून शेतकऱ्यांशी बोलणाऱ्या त्या इसमाच्या कानांवर गेले व त्याने या दोघांकडे वळून पाहिले. डार्टा व प्लाँशे ही जोडी दिसताच त्याने ताडकन् उडी मारली व ''मॉन्शर डार्टा! मॉन्शर डार्टा!!'' असे आनंदाने ओरडतच तो डार्टाकडे धावत आला.

''अरे वाऽ मास्कटाँ, तुझा दिमाख तर खूपच वाढला आहे. पण काय रे, तुझा धनी कुठे आहे?''

''थांबा महाराज, ही आनंदाची बातमी प्रथम मी त्यांना कळवणार. या आनंदाच्या प्रसंगाचं श्रेय मी घेणार!'' असे म्हणत मास्कटाँ धावतच सुटला. मास्कटाँची धांदल पाहून डार्टाला मोठी मजा वाटली. थोड्याच वेळात पार्था त्यांना सामोरा आला व सर्व मंडळी किल्ल्यात गेली. स्वयंपाकघराच्या दिशेने आलेला खमंग वास हुंगून प्लाँशे हळूच म्हणाला, ''पार्थाचं काम काही न्यारंच आहे. त्याने इतक्यात मेजवानीचीही सिद्धता केली वाटतं!'' डार्टाने

एकेक डोळा एवढाला करून त्याच्याकडे पाहिले. त्यामुळे त्याला आपले भाषण जरा आवरते घ्यावे लागले.

पार्थाचे वैभव एखाद्या राजासारखे होते. तेथे कशाचीच कमरतता नव्हती. यामुळे पार्था फिरून आपल्याबरोबर येईल किंवा नाही याची डार्टाला शंकाच होती, तरी पण डार्टाने खडा टाकून पाहाण्याचे ठरविले. ''काय रे पार्था, मला वाटतं आता फिरून कंबरेला तरवार कसून घोड्यावर स्वार व्हायचं तुझ्या काही मनात येणार नाही. या ऐश्वर्यात राहून तू जरा गंजल्यागत झाला असशील नाही?''

''का रे बाबा, असं का म्हणतोस? माझी साहसाची आवड जशीच्या तशी शाबूत आहे.. ना बायको, ना पोर. काढ कामगिरी एखादी आणि मग पाहा या पार्थाची मजा.''

''फार उत्तम, मी त्यासाठीच आलो आहे. माझारीनला आपली जरूर आहे. बघ येत असलास तर.''

''जरूर येईन मी तिथे. पण एक गोष्ट लक्षात ठेव, मला पैशांची काही जरूरी नाही, पण त्या चिकट इटालियनाने मला बॅरनसारखा एखादा हुद्दा जरूर दिला पाहिजे. तसं असेल तरच आपण त्याच्या फंदात पडू.''

''ते माझ्याकडे लागलं,'' डार्टा आनंदाने म्हणाला व मद्याचा एक चषक त्याने घटकन् पिऊन टाकला.

''पण काय रे, आपल्या इतर मित्रांना तू भेटलास का आधी?''

''अरामीला भेटलो, पण तो आता कट्टा जेजुइट झाला आहे. शिलेदार बनण्याचं आता तो मुळीच मनावर घ्यायला तयार नाही.''

''ऑथा काय म्हणतो?''

''त्याचा पत्ताच मला माहीत नाही.''

''तो ब्लाईला राहातो. तो आता काउंट झाला आहे.''

''मग मी उद्याच त्याची गाठ घेतो.''

''पण काय रे, माझारीनचं हे काम आहे तरी काय? आणि ते संपणार केव्हा?''

''मला तरी त्याची नीटशी कल्पना कुठे आहे? पॅरीसला गेल्यावर पाहू सावकाश.'' डार्टा म्हणाला.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे पार्थाचा मोठ्या प्रेमाने निरोप घेऊन डार्टा ब्लाईकडे रवाना झाला. वाटेत डार्टाच्या मनात ऑथासंबंधी अनेक विचार येत होते. ऑथा स्वभावाचा उमदा होता, दिलदार होता, पण त्याचे मद्याचे व्यसन दांडगे होते. ऑथा आता चांगलाच मद्यपी बनला असावा अशीही एक शंका डार्टाला निष्कारणच येऊन गेली. ब्लाईला तो ऑथाच्या प्रशस्त प्रासादापुढे येऊन उभा राहीपर्यंत डार्टाच्या मनातील विकल्प दूर झाला नव्हता. प्लाँशेने पुढे होऊन ''काऊंट ऑथा इथेच असतात ना?'' अशी पहारेवाल्याकडे चौकशी करण्यास आणि ऑथाची गंभीर व प्रशस्त मूर्ती तेथे येण्यास एकच गाठ पडली.

''तुम्हाला कुठेतरी मी पाहिलं असावं असं वाटतं.'' प्लाँशेकडे पाहून ऑथा म्हणाला.

''होय. मॉन्शर ऑथा, मी आपल्या पूर्ण ओळखीचा आहे.'' गहिवरलेल्या कंठाने प्लाँशे उद्गारला. ऑथाचे दातृत्व त्याच्या परिचयाचे असल्याने त्याला पाहाताच तो गहिवरून आला.

''कोण, प्लाँशे? मग मॉन्शर डार्टाही आले आहेत की काय?'' प्लाँशेला ओळखून ऑथा म्हणाला.

डार्टाला पाहून ऑथाचा आनंद गगनात मावेना. मोठ्या प्रेमाने त्याला हाताशी धरून ऑथा दिवाणखान्याकडे गेला. इकडे ग्रीमाँ व प्लाँशे यांचे मेतकूट सुरू होते. ऑथाने डार्टाचा पाहुणचार फारच थाटाने केला. प्लाँशेचे जिव्हालौल्य लक्षात घेऊन ऑथाने ग्रीमाँला त्याचा चांगला समाचार घेण्याबद्दल बजावून ठेविले होते.

रात्री विश्रांतीच्या वेळी डार्टाने आपल्या आगमनाचा हेतू ऑथाच्या कानावर घातला. पण ऑथाने पहिल्या झपाट्यालाच ''पाजी, पैसेखाऊ इटालियन! राजाचं नाव पुढे करून प्रजेला लुटणारा हरामखोर!'' इतक्या शेलक्या शब्दांत माझारीनची पूजा बांधल्याने डार्टाला पुढे बोलायला जागाच राहिली नाही. ''मला हे सगळं मान्य आहे, पण दुसरा चांगला माणूस आणायचा कुठला?'' काही तरी बोलायचे म्हणून डार्टा म्हणाला. पण एवढ्याने ऑथा थोडाच बधणार! शेवटी निराश होऊन डार्टा पॅरीसला परत फिरला. एका पार्थाखेरीज त्याची डाळ कोणाजवळच शिजली नाही.

●●●

## ३. राजकीय कैदी

ब्यूफोर आज कित्येक दिवस तुरुंगात खितपत होता. राणी व माझारीन ह्यांच्या विरुद्ध उघडपणे उभे राहाण्याची पात्रता एकाच व्यक्तीच्या अंगात होती आणि ती म्हणजे ब्यूफोर होय. राणी आणि माझारीन ह्यांचे काही तरी सूत आहे असा उघड आरोपही करण्यास त्याने कमी केले नाही व त्यामुळे त्याला तुरुंगाची हवा खावी लागली. माझारीनचा विश्वासू अधिकारी ला रामी त्याच्या दिमतीला देण्यात आला होता. ब्यूफोरला जनतेचा प्रचंड पाठिंबा असल्याने, राजकीय कैदी ह्या दृष्टीनेच त्याला वागविण्यात येई. परंतु त्याला पळून जाण्याला वाव सापडू नये म्हणून ला रामी मात्र डोळ्यांत तेल घालून जपत असे.

डार्टा पारीसला परत आल्यानंतर दोन चार दिवसांची गोष्ट. ला रामीला भेटण्यासाठी एक मनुष्य आला. त्याला तुरुंगात नोकरी पाहिजे होती. मनुष्य मोठा तऱ्हेवाईक होता. ला रामीला त्याची ती वागण्याची तऱ्हा मोठी अजब वाटली. होय किंवा नाही ह्या दोन शब्दांपलीकडे ह्या प्राण्याला दुसरे काही येतच नसावे, असे त्याला वाटू लागले. त्याने त्या प्राण्याला ब्यूफोरच्या दिमतीला एकच दिवस दिले मात्र, दुसऱ्या दिवशी ब्यूफोर ला रामीला शिव्याशाप देऊ लागला. ''हा मुका प्राणी माझ्या दिमतीला देऊन माझा छळ करण्याचा तुमचा विचार आहे काय?'' त्याने ला रामीला विचारले. ब्यूफोरची ही तक्रार आपल्याविरुद्ध आहे ह्याची दखलसुद्धा त्या इसमाला नव्हती. तो निर्विकार मुद्रा करून ला रामी व ब्यूफोर ह्यांचा संवाद ऐकत उभा होता.

''अहो, ह्याने माझी केस विंचरण्याची फणीही काढून घेतली.'' ब्यूफोर म्हणाला.

ला रामीने आपल्या नव्या नोकराकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. त्याने तत्काळ उत्तर दिले, ''तीक्ष्ण.''

'कैद्याजवळ तीक्ष्ण हत्यार ठेवू देऊ नकोस' ह्या आपल्या हुकुमाची ला रामीला आठवण झाली. फणीचे तीक्ष्ण दातेही आपल्या ह्या हुकुमात जमा करण्यात आल्याचे पाहून त्याला ह्या नोकराचे मोठे कौतुक वाटले, पण वरकरणी ते न दाखविता तो म्हणाला, ''मूर्ख आहे झालं!''

ला रामी बाहेर पडताच ब्यूफोर ग्रीमॉंच्या अंगावर धावून गेला. ब्यूफोरच्या पहाऱ्यावर आलेला हा नवा इसम ऑथाचा घुमा नोकर ग्रीमॉंच होता. ग्रीमॉंने त्याचा प्रतिकार तर केला नाहीच, पण कोणाचे लक्ष नाही असे पाहून चट्कन एक चिठ्ठी ब्यूफोरच्या हातात दिली. ब्यूफोर थंडच झाला. चिठ्ठीत मजकूर होता: ''आपली मित्रमंडळी आपल्या सुटकेच्या नादात आहेत. आलेला इसम विश्वासू असून आपल्याला सर्व प्रकारची मदत करील.''

दुसऱ्या दिवशी ब्यूफोरने ग्रीमॉंविरुद्ध ला रामीकडे फिरून जोरदार तक्रार केली. ला रामीला त्यामुळे ग्रीमॉंचा अधिकच विश्वास वाटू लागला व त्याने ब्यूफोरला दुसरा चांगला इसम मिळेपर्यंत ग्रीमॉंलाच सांभाळून घेण्याची विनंती केली.

आज ब्यूफोरने आपला वाढदिवस तुरुंगातच साजरा करण्याचे ठरविले. रात्री ला रामीला त्याने आपल्या खोलीत जेवायला येण्याचे आमंत्रण दिले. ग्रीमॉंने तुरुंगाबाहेरच दुकान थाटून बसलेल्या मेवेवाल्याकडून उत्तम मद्य व पक्वान्ने आणण्याची योजना केली होती. ब्यूफोरच्या खाजगी खर्चातून मेजवानीचा बेत झडणार असल्याने ला रामी खूश होता. मेजवानीचा बेत संध्याकाळी साताचा होता. पण ला रामी सहापासूनच लुडबुड करू लागला होता. ग्रीमॉंने आपल्या खांद्यावरून आणलेली प्रचंड गुरोळी पाहाताच तर त्याच्या तोंडाला पाणीच सुटले. ब्यूफोरच्या खोलीत एक मेज व दोन खुर्च्या मांडण्याची व्यवस्था त्याने केली.

''ला रामी, तुमच्या माझ्यावरील लोभामुळेच मला आज हा दिवस साजरा करता आला!'' ब्यूफोर म्हणाला.

''कसचं कसचं?'' ला रामी म्हणतो, ''आपली योग्यता काय आमच्या हाताखाली कैद भोगण्याची आहे? पण काळच विचित्र आला!''

''म्हणजे माझी कैद आपल्यालाही पसंत नाही तर?'' त्याच्या हाती मद्याचा चषक देऊन ब्यूफोर विचारतो.

''अलबत!''

''माझी इथून सुटका झाली तर आपल्याला बरं वाटेल?''

''नि:संशय!''

मद्याने व सुग्रास अन्नाने खूश झालेला ला रामी ब्यूफोरला खूश करण्यासाठी म्हणाला.

इतक्यात ग्रीमाँने वाढदिवसासाठी आणलेली ती प्रचंड गुरोळी फोडून तीमधील खंजीर इतक्या शिताफीने ला रामीच्या नरड्याला लावला की एक शब्द तोंडावाटे बाहेर काढणे म्हणजे प्राणाला मुकणे होय, हे त्याला कळून चुकले. आपला हा मुका नोकर आपल्याच घाताला कारणीभूत झालेला पाहून ला रामी थक्क झाला. हां हां म्हणता ब्यूफोर व ग्रीमाँ ह्यांनी ला रामीची गठडी वळली व गुरोळीतून आलेली दोरी घेऊन अंधारातून लपत छपत तुरुंगाच्या तटाची वाट धरली. दोरीच्या साहाय्याने त्यांनी तटावरून उतरून आपली मुक्तता करून घेतली.

त्यांच्यासाठी ठरल्याप्रमाणे तटाबाहेर घोडे घेऊन त्यांची मित्रमंडळी उभी होतीच. क्षणाचाही विलंब न लावता सर्व मंडळी वायुवेगाने निघाली.

डार्टा व पार्था माझारीनच्या खोलीत बोलत उभे होते, इतक्यात ब्यूफोरच्या पलायनाची वार्ता घेऊन एक मनुष्य धडपडतच आत आला. वार्ता ऐकून माझारीनचे धाबे दणाणले. तो केविलवाणे मुद्रा करून म्हणाला, ''घात झाला! आता हा फिरून कसा हाती लागणार?''

''महाराजांनी हुकूम करावा, मी त्याला खेचून घेऊन येईन.'' डार्टा म्हणाला. डार्टाच्या ह्या म्हणण्याला पार्थाने पण जोराने पुष्टी दिली.

थोड्याच वेळात डार्टा-पार्थाची दुक्कल सोसाट्याने घोडे दौडीत पारीसमधून बाहेर पडली.

थोड्याच मजलीत त्यांच्या मांडीखालील जनावरे फेस गाळू लागली, ठेचकाळू लागली, पण डार्टाने त्यांची पर्वा केली नाही. कैद्याचा माग लागल्याकारणाने जनावरांना विश्रांती देण्याचेही त्याच्या जिवावर आले होते, पण त्याच्या सुदैवाने एका झोपडीच्या दारातच दोन उमदे घोडे बांधलेले त्याला दिसले. तत्काळ डार्टा-पार्थांनी ती दोन जनावरे ताब्यात घेतली व मालकाच्या आरड्याकडे लक्ष न देताच घोडे पिटाळले.

''कोण चालले आहे?'' खड्या सुरात विचारलेला हा प्रश्न त्यांच्या कानी आला व अंधारातून एक आकृती पुढे येऊन त्यांचा मार्ग रोखून उभी राहिली. ''चल हट. हो बाजूला'' डार्टा खेकसला. इतक्यात दोन घोडेस्वारांनी त्यांचा मार्ग पूर्ण रोखला. तरवारींचा खणखणाट चालू झाला. थोड्याच वेळात डार्टा-पार्थाला कळून चुकले की आपल्याबरोबर लढणारी माणसे आपल्याइतकीच कसबी आहेत.

''ऑथा-अरामी आज दुर्दैवाने आपल्या बरोबर नाहीत. नाहीतर ह्या बेट्यांना दाखवला असता इंगा!'' निराश होत डार्टा चरफडला.

''कोण, मान्शर डार्टा!'' त्याचा शत्रू तरवार आखडती घेऊन म्हणाला.

''कोण पार्था!'' पार्थाच्या शत्रूनेही तेच केले.

ब्यूफोरच्या वतीने डार्टा-पार्थाचा मार्ग रोखून आज ऑथा व अरामी उभे होते. डार्टाची निराशा झाली. ''मला कैदी न घेताच परत जाणे भाग आहे काय?'' डार्टाने विचारले.

''तसंच काही नाही!'' आपल्या हातातील तरवार फेकून देऊन ऑथा म्हणाला. ''मला ठार मारून तुला कैदी नेता येईल. हा मी तुझ्यापुढे उभा आहे!''

अरामीनेही काडकन् आपली तरवार मोडून फेकून दिली. ''एका काळच्या जिवलग मित्राविरुद्ध मी ही चालवली!'' तो कष्टी आवाजाने म्हणाला.

डार्टाने ऑथाच्या गळ्याला मिठी मारली. ''राजे नि प्रधान येतील नि जातील, पण त्यांच्यासाठी आमच्या तरवारी मित्रांच्या रक्ताने रंगणार नाहीत!'' तो म्हणाला.

''माझारीनच्या पक्षाचे काय किंवा प्रजापक्षाचे काय, आपण कुठल्याही पक्षाचे असलो तरी मित्रच राहू!'' ऑथा म्हणाला.

इतक्यात खुद्द ब्यूफोरच पुढे येऊन म्हणतो, ''मॉन्शर डार्टा, तुमच्या ह्या मित्रांनी माझी अत्यंत खटपटीने सुटका केली आहे. त्यांच्या श्रमाचं फळ अशा तऱ्हेने तुम्ही घालवू इच्छिणार नाही असं मला वाटतं.''

थोड्याच वेळात डार्टा व पार्था पारीसला परत फिरले. माझारीनला काय थाप मारावी ह्याचा त्याच्या चलाख डोक्यात विचार चालला होता.

●●●

## ४. इंग्लंडची दुर्दैवी राणी

सीन नदीच्या काठी असलेल्या कॅथॉलिकांच्या भव्य मठात, इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स ह्याला यशप्राप्ती व्हावी म्हणून प्रार्थना चालली होती. इंग्लंडमध्ये राजा व प्रजा ह्यांच्यात निकराचा संग्राम चालू होता व दोन्ही पक्षांचे हेर फ्रान्समध्ये वावरत होते. ह्या शेजारच्या राष्ट्राची आपल्याला सहानुभूती राहावी म्हणून दोन्ही पक्षांच्या खटपटी चालू होत्या. फ्रान्समधील कॅथॉलिकांची बरीचशी सहानुभूती राजाला होती व ह्याच मठाच्या आश्रयाला त्याची पत्नी हेन्रीटा व मुलगी येऊन राहिली होती. राणीचे सौंदर्य अनेक चिंतांनी कोमेजून गेले होते. तिला दारिद्र्यांत दिवस काढावे लागत होते, पण तिची पतिनिष्ठा काडीमात्र कमी झाली नव्हती. राणी गुडघे टेकून आपल्या पतीला यश मिळावे म्हणून मनोभावाने प्रार्थना करण्यात गढून गेली होती. तिची नऊ वर्षांची मुलगी तिच्या गळी पडून म्हणत होती,

''आई! आई, तू इथल्या राणीकडे का जात नाहीस गं? ती तुझी बहीण आहे ना? तिचा मुलगा इथला राजा आहे ना गं?''

''बाळ, माझी बहीण आता खरी राणी नाही. तिचा मुलगा लहान आहे आणि त्याच्या नावावर भलतेच लोक राज्य करीत आहेत. तिथे आपल्याला कोण विचारणार?'' इतक्यात एक इसम आत आला व इंग्लंडहून कोणी एक गृहस्थ राजाचा निरोप घेऊन आला आहे म्हणून सांगू लागला. मायलेकींना ही बातमी ऐकून आनंद झाला. राणीने त्या गृहस्थाला आत पाठवून देण्यास सांगितले. चार्लसचा विश्वासू सरदार लॉर्ड विंटर आत आला व त्याने नम्रपणे राजाचा खलिता व एक थैली राणीच्या स्वाधीन केली. पत्रात राजाने आपण आपल्या बंडखोर प्रजेचा बंदोबस्त करण्याच्या उद्योगात असल्याचे कळविले असून प्रत्यक्ष हकीकत विंटर तोंडी सांगेल असे लिहिले होते. ''राजाकडे माणसे फारच थोडी असून जयाची फारशी आशा दिसत नाही.'' हे विंटरचे शब्द ऐकून राणीला धक्का बसला. ''पराभव झाल्यास महाराजांचा फ्रान्समध्ये येण्याचा विचार आहे,'' असे विंटरने सांगताच राणी म्हणाली, ''त्यांना म्हणावं, एवढं मात्र करू नका! माझी प्रत्यक्ष बहीण इथे राणी असून आम्ही थंडीवाऱ्यात कुडकुडत आहोत. उपवास काढत आहोत. तिथे तुम्हाला कोण विचारणार?'' राणीला पुढे बोलवेना. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या.

''राणीसाहेबांनी व्यर्थ चिंता करू नये. तितका प्रसंग आलाच तर आम्ही महाराजांना घेऊन हॉलंडलाही जाऊ शकू. पण तत्पूर्वी मला वाटतं आपण इथल्या राणीसाहेबांची एकदा गाठ घ्यावी.'' विंटर म्हणाला.

थोड्याच वेळात विंटर व राणी मठातून बाहेर पडली.

इंग्लंडची राणी व विंटर फ्रान्सच्या राणीची भेट घेण्यासाठी वाड्यात येऊन पंधरावीस मिनिटे झाली असतील नसतील, इतक्यात माझारीनचा कारभारी बोर्नोई ह्याच्यापुढे एक तरुण मनुष्य येऊन उभा राहिला. ''आपण कोणाकडून आला आहा?'' बोर्नोईने त्यास विचारले.

''इंग्लंडचे सेनापती ऑलिव्हर क्रॉमवेल ह्यांच्याकडून मी माझारीन ह्यांना एक पत्र घेऊन आलो आहे.'' तो तरुण उत्तरला.

''द्या आपला खलिता. मी पोचता करतो.''

''खुद्द माझारीनखेरीज तो मी इतर कुणाच्या हाती देऊ शकत नाही.'' तो तरुण निर्भीडपणे उत्तरला. बोर्नोईचा नाइलाज झाला. थोड्याच वेळात क्रॉमवेलच्या त्या तरुण वकिलाला माझारीनपुढे नेऊन उभे करण्यात आले. माझारीन आपल्या भेदक नजरेने क्रॉमवेलच्या दूताकडे पाहात म्हणतो, ''आपण फारच तरुण दिसता.''

''होय महाराज, माझं वय तेवीस -चोवीस वर्षांचंच आहे, पण आपल्या ह्या देशातल्या कुणीतरी चार शिलेदारांनी माझ्या आईचा खून केल्यामुळे माझं सर्व आयुष्य हालअपेष्टांत गेलं नि त्यामुळे मी तरुण असूनही म्हातारा दिसू लागलो आहे.''

''अरेरे! त्याबद्दल मला वाईट वाटतं. ते शिलेदार मला सापडले तर त्यांना मी जरूर शिक्षा करीन. तुमची हकीकत मोठी विलक्षण दिसते.''

''माझ्या आईविरुद्ध केलेल्या त्या कटात माझा चुलताही सामील होता. माझी सर्व इस्टेटही त्यानेच गिळंकृत केली आहे नि आता तर तो इंग्लंडच्या राजाचा आवडता सरदार आहे.''

''अस्सं! आणि म्हणून आपण क्रॉमवेलचा आश्रय केलात होय?'' माझारीन खोचून म्हणाला.

''होय महाराज, आपण म्हणता ते काही खोटं नाही.'' क्रॉमवेलचा दूत निर्भीडपणे म्हणाला. माझारीनने क्रॉमवेलचा खलिता फोडून वाचला, त्यात इंग्लंडच्या परिस्थितीचे सविस्तर वर्णन करण्यात आले असून लोकपक्षाच्या विजयाबद्दल निश्चिती प्रकट केलेली होती. त्याचप्रमाणे पराभूत इंग्लिश राजाला फ्रान्समध्ये आश्रय दिला गेल्यास फ्रान्सशी नाइलाजाने युद्ध पुकारावे लागेल. ह्यासाठी फ्रान्सने आपली तटस्थता सोडू नये असेही सुचविले होते. खलिता वाचून झाल्यानंतर थोडा वेळ विचार करून माझारीन म्हणतो ''मॉन्शर, माझ्या उत्तराची जर कुठे वाच्यता होणार नसेल तर ह्या पत्राचं उत्तर देण्याची माझी तयारी आहे. आपण बोलोन इथे दहा दिवस थांबा. तोपर्यंत माझी माणसं माझं उत्तर घेऊन आपल्याकडे येतील.''

''ठीक आहे. आपलं उत्तर बाहेर फुटणार नाही असं वचन मी आपल्याला माझ्या धन्याच्या वतीने देऊ शकतो.'' मोर्डा - क्रॉमवेलचा दूत - म्हणाला.

मोर्डा बाहेर पडून थोडा वेळ झाला नाही तोच इंग्लंडची राणी हेन्रीएटा व राजाचा सरदार विंटर ही माझारीनला भेटण्यास आली. ही दुक्कल कदाचित बाहेर पडणाऱ्या मोर्डाच्या नजरेला आली असावी.

''मी माझ्या बहिणीपाशीच प्रथम गोष्ट काढणार होते, पण म्हटलं फ्रान्सची सूत्रं आज आपल्या हाती आहेत, तेव्हा प्रथम आपल्यालाच गळ घालावी म्हणून मी आज आपल्या भेटीस आले आहे.'' राणी माझारीनला म्हणाली.

''सरकारनी आपल्या भेटीचा प्रथम मान मला देऊन मला ऋणी केलं आहे.'' माझारीन विनयाचे दांडगे नाटक करून म्हणाला.

''मी आपल्याला एक विनंती करायला आले आहे. इंग्लंडमधील प्रजा बंडाळी करून उठली आहे. महाराज तिचा बंदोबस्त करण्याच्या खटपटीत आहेतच, पण न जाणो वेळ फिरलीच तर त्यांना फ्रान्समध्ये आश्रय मिळावा, म्हणून म्हणते...... ''

''सरकार, पण आज फ्रान्समध्ये तरी कुठे शांतता आहे?'' माझारीन मध्येच म्हणतो. ''शिवाय आमच्या राजांचंही पोरवय. अशा परिस्थितीत ही जबाबदारी.....''

''निदान इंग्लंडमध्ये काही कुमक पाठविता येणं शक्य असल्यास पाहावं.''

''माझारीन पक्का होता. तो म्हणतो, ''मला वाटतं काही झालं तरी राजांनी देशत्याग करूच नये. परकीय राष्ट्रांतील सैन्य मदतीला घेणं म्हणजे आपलाच आपल्या प्रजेवर विश्वास नाही असं सांगण्यासारखं नाही का?''

हा इटालियन बधण्याची काही आशा नाही अशी खात्री होताच राणी निराश मनाने विंटरला घेऊन बाहेर पडली. राजाच्या रक्षणाची शेवटची आशाही आता नष्ट झाली.

''सरकारनी धीर सोडू नये. परमेश्वर अजूनही बरे दिवस दाखवील.'' तिला धीर देण्याच्या उद्देशाने विंटर म्हणाला.

''आता आशा करणं व्यर्थ आहे! विंटर, आता जगात तुमच्याखेरीज आम्हाला कोणी मित्र नाही!''

लॉर्ड विंटर आठवल्यासारखे करून म्हणतो, ''माझे चार फ्रेंच शिलेदार स्नेही आहेत. मागे त्यांनी माझ्या भावजयीच्या बाबतीत व बकिंगहॅम महाराजांच्या बाबतीत अजब करामत करून दाखविली आहे. त्यांचं साहाय्य मिळालं तर किती तरी काम होईल.''

''मग पाहा त्या चौघांचं साहाय्य मिळतं का? प्रयत्नांत कसूर व्हायला नको.''

राणीचा निरोप घेऊन विंटर आपल्या चार शिलेदारांना कसे गाठावे ह्याचा विचार करीत आपल्या मकानाकडे परतला. घरी येईपर्यंत आपला पाठलाग होत आहे हे त्याच्या लक्षातही आले नाही. खोली उघडून तो आत येताच त्याच्या पाठोपाठ दुसरीही एक व्यक्ती आत शिरली व विंटरपुढे उभी राहिली. तो क्रॉमवेलचा दूत मान्शर मोर्डा होता!

●●●

## ५. एक जुनी हकीकत

''काकासाहेब,'' मान्शर मोर्डा म्हणतो, ''मला जुन्या गोष्टी नीटशा माहीत नाहीत, पण आज आपल्या तोंडून थोड्या फार कळल्या. आणखी कळाव्यात अशी इच्छा आहे.''

''अरे जा! तुझ्या गोष्टींशी माझा काही संबंध नाही, मला उगीच सतावू नकोस!'' विंटर त्याला झिडकारण्याच्या हेतूने म्हणाला.

''माझा संबंध काय? थेरड्या, तेच सांगण्यासाठी तर मी इथे आलो आहे.'' दातओठ खात मोर्डा म्हणाला. ''राजाच्या कानी लागून भावाची इस्टेट लाटणाऱ्या, भावजयीचा खून करून तिच्या मुलाला बेकार करणाऱ्या कपटी नीचा! आज तुला जाब विचारायलाच मी आलो आहे.''

लॉर्ड विंटर धीराचा सरदार खरा, पण मोर्डाची ती भयंकर मुद्रा पाहून त्याचाही धीर खचला. स्वत:ला कसेबसे सावरून तो म्हणतो, ''ठीक आहे. तुला तुझ्या आईचं चरित्रच ऐकायचं आहे असं दिसतं. तिने माझ्या भावाला - स्वत:च्या नवऱ्याला - विषप्रयोग केला होता. रिशल्यूच्या हेराचं काम करून तिने बकिंगहॅमचा खून करविला. फ्रान्समध्ये अनेक लोकांना तिने विषप्रयोग केला आणि ह्या सर्वाचं प्रायश्चित्त म्हणून तिला फ्रेंच शिलेदारांनी चांडाळाकरवी ठार केलं. ह्यांतला प्रत्येक शब्द खरा आहे ह्याबद्दल तुला पुरावा पाहिजे?''

''काही झालं तरी ती माझी आई होती! माझ्या आईचा अमानुष रितीने वध करणाऱ्या प्रत्येकाचा मला सूड घ्यायचा आहे. आज तू एक गुन्हेगार माझ्यापुढे उभा आहेस, बाकीच्या चौघांचा मला अद्यापि ठावठिकाणा माहीत नाही म्हणूनच मी थांबलो आहे.'' अनावर झालेला आपला क्रोध दाबण्याचा प्रयत्न करीत मोर्डा म्हणाला. त्याच्या कपाळावरील एकूण एक शीर तट्ट फुगली होती. चेहरा लाल भडक झाला होता. डोळ्यांत खून चढला होता.

''लक्षात ठेव. तुमच्या प्रत्येकाच्या छातीत खंजीर खुपसल्याखेरीज मी केव्हाच शांत होणार नाही.'' एवढी धमकावणी देऊन मोर्डा बाहेर पडला.

''एकंदरीत तो मला एकट्यालाच ओळखतो असं दिसतं'' कपाळावरील घाम पुशीत विंटर पुटपुटला.

ब्यूफोरची सुटका केल्यानंतर ऑथा व अरामी ह्यांना डार्टा व पार्थाची काहीच वार्ता कळली नाही. माझारीनला काहीतरी थाप मारून डार्टा वेळ मारून नेल्याशिवाय राहाणार नाही ही दोघांनाही खात्री होती पण एकदा त्याची प्रत्यक्ष गाठ घ्यावी म्हणून दोघेही पारीसला आले. पारीसला येताच इंग्लंडची राणी फ्रान्सच्या आश्रयाला आल्याची व तिच्याबरोबर विंटर नावाचा सरदार आल्याची वार्ता त्यांना कळली. विंटरचे नाव ऐकताच ह्या दोघांनाही मिलडीचा वृत्तांत आठवला. तिच्या ह्या दिरामुळेच मिलडीच्या कुटिल कारस्थानांतून त्यांची मुक्तता झाली असल्याने ऑथा व अरामी ह्यांनी प्रथम त्याची गाठ घेण्याचे ठरविले. न जाणो, तो एखादे वेळी फ्रान्स सोडूनही जायचा. विंटर ह्या शिलेदारांचा पत्ता कसा काढावा ह्या चिंतेत असता अकस्मात ऑथा व अरामी त्याच्या पुढे येऊन उभे राहिले. विंटरचा आनंद गगनात मावेना.

''सरकार! सरकार!! देव अद्यापि आपल्याला विसरला नाही!'' तो आनंदाने इंग्लंडच्या राणीला उद्देशून ओरडला.

सध्या राणी जेथे राहात होती ती बोलून चालून मठातील धर्मशाळावजा जागा होती. तिचे वैभव ते काय असणार? विंटरची हाक ऐकून राणी बाहेर आली. फ्रान्सच्या राजघराण्याशी निकटचा संबंध असणाऱ्या इंग्लंडच्या राणीची ती दीन दशा पाहून ऑथा व अरामी ह्यांना भडभडून आले. आपल्या दोघाही मित्रांना उद्देशून अरामी म्हणाला,

''माझारीन हा नीच इटालियन ऐश्वर्यात लोळत आहे! आणि फ्रान्सच्या राजघराण्याचे नातलग दारिद्र्यात पिचत आहेत!''

''बाबा, आज फ्रान्सला राजा कुठे आहे? माझारीनच फ्रान्सचा राजा होऊन बसला आहे.'' ऑथा उत्तरला.

राणीने दारात येऊन ह्या दोघा वीरांचे स्वागत केले. विंटरने सांगितलेल्या फ्रेंच शिलेदारांपैकीच हे दोघे असावेत एवढा अंदाज तिला आला होता. राणीचे दारिद्र्य व हीन

दशा पाहून अरामीचे अंत:करण फिरून एकदा उचंबळून आले. तो कावराबावरा होऊन इकडे तिकडे पाहू लागला. त्याची चलबिचल पाहून राणी खिन्न होऊन म्हणाली, ''माझं हे चमत्कारिक वैभव पाहून तुम्हाला काय वाटतं?''

''महाराज, माफी असावी, फ्रान्समध्ये आपला असा उपमर्द झालेला पाहून वाईट वाटतं आम्हाला!''

अरामीचे हे उद्गार ऐकून त्या संकटग्रस्त राणीला थोडे फार समाधान वाटले. लॉर्ड विंटरने दोघांच्या पराक्रमाचे व दानतीचे गौरवपूर्ण भाषेत केलेले वर्णन ऐकून राणी म्हणाली, ''काही दिवसांपूर्वी माझा शब्द झेलायला हजारो लोक तयार असत. आज ह्या दुर्दैवी स्त्रीपाशी ह्या एका सरदाराशिवाय कोणीही नाही, मला आता वैभवच नाही, मी आपल्यासारख्या शूरांचा गौरव कसा करू?''

''सरकारस्वारीकडून आम्हाला कशाचीच अपेक्षा नाही; आमच्या हातून राणीसाहेबांचं काही कार्य झालं तर आम्ही स्वत:ला धन्य समजू!'' ऑथा म्हणाला. अरामीनेही त्याचीच री ओढली.

''सगळ्या जगाने मला सोडलं. अशा वेळी तुम्ही माझ्या साहाय्याला धावून आला; मी तुमची दुर्दैवी बहीण आहे. महाराजांच्या खालोखाल मी तुम्हाला समजते. त्यांच्याजवळ राहून त्यांचं संरक्षण करता आलं तर पाहा!'' डोळ्यातील अश्रू टिपीत राणी म्हणाली.

''आम्ही आमचे प्राण खर्ची घालू, पण आमच्यावर बहीण म्हणून विसंबलेल्या स्त्रीला विसरणार नाही. आम्ही हाडाचे शिलेदार आहोत!'' ऑथा म्हणाला.

त्यांनी तत्काळ विंटरबरोबर इंग्लंडला जाण्याची तयारी केली. डार्टा व पार्थाला आपल्या कार्यक्रमाची पत्रे लिहिण्यास ते विसरले नाहीत.

पारीस सोडल्यापासून तिसऱ्या दिवशी सायंकाळच्या सुमारास विंटर, ऑथा व अरामी बोलोनला पोचले. पूर्वी राणीची रत्नमाला आणायला ते ह्याच मार्गाने इंग्लंडकडे निघाले होते. त्यामुळे त्यांना वाटभर गप्पा मारायला विषय होता. आज ते इंग्लंडचा राजा चार्लस् ह्याला मदत करायला चालले होते. शहरात येताच ऑथा, अरामी व ऑथाचा नोकर ग्रीमाँ ह्यांना विंटरने बंदराकडे राजरस्त्याने रवाना केले आणि आपला कोणास संशय येऊ नये व आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून त्याने जरा आडवळणाचा मार्ग पत्करला.

ऑथा व अरामी धक्क्यावर चकरा मारीत असता, खिन्न चेहेऱ्याचा एक मनुष्य अस्वस्थ मनाने इकडे तिकडे वावरताना त्यांना दिसला. धक्क्याला लागून खाली एक होडी होती व तीमध्ये इंग्लिश खलाशी दिसत होते.

''हीच होडी बहुधा आपल्याला इंग्लिश गलबतावर नेणार असेल. पण अद्यापि विंटर कसा आला नाही बुवा?'' अरामी ऑथाला म्हणाला.

''शूऽ चूप बैस! कुणीतरी ऐकेल ना!'' ऑथाने त्याला दटावले. पण ऑथाच्या त्या सूचनेचा आता उपयोग नव्हता. फाटक्या अंगाच्या त्या मनुष्याने अरामीचे शब्द ऐकले होते व ते ऐकून तो कावराबावराही झाला होता. पण शक्य तितके स्वत:ला सावरून तो अरामीला म्हणतो, ''आपण पारीसहून आला काय?''

''होय!'' ऑथाने सभ्यपणाने उत्तर दिले.

''अस्सं!'' म्हणून तो विक्षिप्त मनुष्य पुढे निघून गेला. इतक्यात घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे पाहात विंटर आला. ऑथाने विंटरला घाबरण्याचे कारण विचारले. पण तो विशेष बोलण्याच्या मनस्थितीत न दिसल्याने ऑथाने चौकशी केली नाही. थोड्याच वेळात अंधार झाला व ही मंडळी होडीत बसून गलबताकडे जाण्यास निघाली. किनाऱ्यावरील खडकाचा एक प्रचंड कडा एके ठिकाणी पाण्यावर पुढे झुकलेला असून त्याच्या जवळूनच होडीचा मार्ग होता. मघाचा तो संशयास्पद हालचाल करणारा मनुष्य कड्यावर उभा राहून होडीकडे पाहात होता. मशालीच्या प्रकाशात तो ऑथाला स्पष्टपणे दिसला.

''हेर!'' अरामीला डिवचून तो हळूच म्हणाला.

''कुठे आहे?'' ऑथाचे भाषण विंटरच्याही कानी जाऊन त्याने कड्याकडे पाहिले.

''हाय रे देवा! घात झाला!! तो इथेही आहेच!'' विंटर घाबरून म्हणाला.

''कोण तो?'' अरामीने विचारले.

''मोर्डा! मिलडीचा मुलगा!! क्रॉमवेलचा हस्तक!!!''

''मिलडीचा मुलगा!'' ऑथा आश्चर्याने ओरडला.

ऑथाचे शब्द खडकावरील त्या मनुष्याला स्पष्टपणे ऐकू गेले. त्याने एकदा निरखून होडीकडे पाहिले. ''होय, मीच आहे! मी ओळखलं आपल्याला, बरं!'' तो म्हणाला.

अरामीने शांतपणे आपल्या सामानातून आपली बंदूक बाहेर काढली व नेम धरला.

''झाडा गोळी!'' कधी न बोलणारा ग्रीमाँ म्हणाला.

''चूप मूर्खा!'' अरामीचा हात पकडून ऑथा काही बोलणार इतक्यात कडाडधूऽम असा बंदुकीचा बार झाला. ऑथाच्या धक्क्याने अरामीचा नेम चुकला; गोळी लागून कड्याचा एक खपला मात्र उडाला.

''सगळा घात केलास! बरोबर त्याचे छाताड फोडणार होतो मी.'' अरामी कुरकुरला.

''स्त्रीहत्या झाली तेवढी पुरे! तिने आपला अपराध केला होता, ह्या तिच्या पोराने काय केले आहे?'' ऑथा घोगऱ्या आवाजात म्हणाला.

थोड्याच वेळात सर्वजण गलबतावर आले व गलबत पाणी कापीत इंग्लंडच्या दिशेने निघाले.

●●●

## ६. डार्टाची हिकमत

ब्यूफोरची सुटका झाल्याने पारीसचे वातावरण बिघडले. लोक उघड उघड बंडाची भाषा करू लागले. गावात ठिकठिकाणी लोकांनी नाकेबंदी केली. राजदूतांना उजळ माथ्याने वावरणे अशक्य होऊ लागले. माझारीनचा जीव खालीवर होऊ लागला. ब्यूफोर हाती न लागल्याने तर तो फारच निराश झाला. वस्तुत: तो डार्टाला कमीअधिक बोलणार होता, परंतु पारीसचे वातावरण पाहून डार्टाला दुखविण्याची त्याची छाती झाली नाही. त्याशिवाय क्रॉमवेलच्या खलित्याचे उत्तर देऊन डार्टाला इंग्लंडला पाठविण्याचा त्याचा विचार असल्याने ब्यूफोरच्या बाबतीत त्याने मौनच पाळले. इकडे ॲन राणीचीही अस्वस्थता वाढू लागली होती. तिच्या मनातून राजपुत्राला घेऊन सेंटजर्मेनला जाऊन तळ ठोकावा असे फार होते. पारीसचे वातावरण तिलाही भीतीप्रद वाटू लागले होते. ब्यूफोर राजपुत्राला ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यासही कचरणार नाही, हे ती ओळखून होती व तसा काही प्रकार घडल्यास माझारीनची व आपली शंभर वर्षे भरली हेही ती जाणून होती. पूर्वीच्या राजवटीपैकी डार्टाच काय तो आता तिच्या हाती लागण्याजोगा होता व म्हणून तिने डार्टाला बोलावून घेऊन आपल्याला सुरक्षितपणे सेंटजर्मेनच्या किल्ल्यात नेऊन पोचविण्याची गळ घातली. सेंटजर्मेनची शिबंदी भक्कम असून तेथले लष्कर राणी व माझारीन ह्यांना अनुकूल असल्याने राणीने हा मार्ग पत्करला होता. राणी, माझारीन व राजपुत्र ह्यांना सुरक्षितपणे पारीसमधून बाहेर काढून सेंटजर्मेनला पोचविण्याची कामगिरी डार्टा-पार्थानी शिरावर घेतली.

डार्टा जबाबदारी पत्करून बसला खरा पण आज पारीसचे स्वरूप त्याला काही विलक्षणच दिसले. शहराच्या प्रत्येक सडकेवर लोकांनी कडेकोट बंदोबस्त केला होता. एकही वाहन पुरी विचारपूस केल्याशिवाय सोडण्यात येत नव्हते. राजसत्तेचे समूळ उच्चाटन पारीसमधून तर झाले होतेच पण विशेष आश्चर्याची गोष्ट ही की माझारीन शहर सोडून पळून जाणार असल्याची भुमकाही गावात उठली होती व लोक विशेष जागरूक होते. आपल्याला कोणत्या मार्गाने बाहेर पडता येईल हे पाहाण्यासाठी डार्टाने सबंध शहराला फेरी घातली. लोकांनी अनेक वेळा त्याला हटकले, पण माझारीनला शिव्या देण्यात लोकांच्याही पुढे मजल मारून डार्टाने आपली सुटका करून घेतली. एके ठिकाणी एक बंदिस्त गाडी उभी असलेली त्याला दिसली. गाडीवर लोकपक्षाची चिन्हे काढलेली असून लोकपक्षाचा कोणीतरी पुढारी तीमधून प्रवास करणार असावा असे स्पष्ट दिसत होते. गाडीवान आपल्या जागी बसून पेंगत होता.

डार्टाच्या चलाख डोक्यात एक कल्पना आली. तो हळूच गाडीत बसला व त्याने हलकेच गाडीवानाच्या

हाताला स्पर्श करून गाडी हाकलण्याचा इशारा दिला. ''राजवाड्याकडे'' तो पुटपुटला. गाडीवान खडबडून जागा झाला व आपल्या धन्याचाच इशारा आहे असे समजून त्याने राजवाड्याच्या दिशेने गाडी भरधाव सोडली. वाड्याच्या पहारेवाल्याकडून गाडी अडवली जायची, पण पडदा बाजूला सरून डार्टाने डोके बाहेर काढल्यामुळे कोणीही अडथळा केला नाही व गाडी सरळ मधल्या चौकात येऊन उभी राहिली. गाडीवान खाली उतरला व त्याने दरवाजा उघडला. डार्टाने गाडीतून बाहेर उडी टाकताच तो चाटच पडला! डार्टाने त्याची मानगूट पकडून त्याला पहारेवाल्यांच्या ताब्यात दिले व सांगितले, ''ह्याला डांबून ठेवा व ह्याचे कपडे काढून घ्या. जरा गडबड केलीन अगर आरडा केलान तर त्याचे तुकडे करून टाका. जर ह्यात कसूर झाली तर तुम्हाला गोळ्या घालीन!'' डार्टाचे ते भयानक शब्द ऐकताच गाडीवानाची बोबडीच वळली. त्याने आपल्या हातांनी कपडे काढून दिले.

मध्यरात्रीच्या सुमारास डार्टाने राणी, राजपुत्र व माझारीन ह्यांना गाडीत आणून बसविले व आपण गाडीवानाचा पोशाख घालून गाडी हाकण्यास आरंभ केला. पार्थाही आत गाडीतच बसला. गाडी वेशीपाशी येताच चौकीदाराने पुकारले पण गाडीवरील लोकपक्षाची चिन्हे व गाडीवानाचा लोकपक्षाचा पोषाख पाहून त्याने विशेष पंचाईत केली नाही. हां हां म्हणता गाडी पारीस सोडून सेंटजर्मेनच्या मार्गाला लागली. सेंटजर्मेनला पोचल्यानंतर राणी डार्टाला म्हणाली, ''मान्शर डार्टा, तुमच्या आजच्या कामगिरीबद्दल तुम्हाला भारंभार सोनं दिलं पाहिजे.'' माझारीननेही डार्टाची तोंडभर स्तुती केली व हळूच क्रॉमवेलला द्यायचा लखोटा त्याच्या स्वाधीन केला. ''मान्शर डार्टा, तुम्ही व पार्था बोलोनला जाऊन मान्शर मोर्डाची गाठ घ्या व त्याच्याबरोबर इंग्लंडला जाऊन हा लखोटा क्रॉमवेलच्या स्वाधीन करा. तेथून आल्यानंतर तुमच्या सर्व कामगिरीचं चीज करण्याचा माझा निश्चय झाला आहे.'' माझारीन म्हणाला.

ऑथा-अरामी इंग्लंडला गेले असल्याची वार्ता डार्टाला कळली असल्याने डार्टाला मनातून आनंदच झाला पण तो वर न दाखविता त्याने अशी कष्टी मुद्रा केली की माझारीनला त्याला खूश करण्यासाठी वाटखर्चाला म्हणून बरीच मोठी रक्कम द्यावी लागली.

●●●

## ७. इंग्लंडचा दुर्दैवी राजा

इंग्लंडला जाण्यापूर्वी एकदा पारीसला जाऊन यावे म्हणून डार्टा-पार्था परत पारीसला आले. दरबारी मंडळी नाहीशी झाल्यामुळे लोकांना चांगलेच फावले होते. खुद्द राजवाड्याच्या अंगणात लोकसैनिकांची कवाईत चालू होती व प्लाँशे तीवर देखरेख करीत होता. प्लाँशेची ही करामत पाहून डार्टा खूश झाला. आपला नोकर चार पावले आपल्याही पुढे गेलेला पाहून डार्टासारख्या उमद्या धन्याला का आनंद होणार नाही? तो आपल्या बिऱ्हाडी आला, तेव्हा मॉडेलीबाईने त्याच्या हाती एक पत्र आणून दिले. पत्र अरामीचे होते. त्यात त्याने निर्वाणीने लिहिले होते, ''मी व ऑथा इंग्लंडच्या राणीने आम्हाला बहीण म्हणून गळ घातल्याने राजाच्या रक्षणार्थ येथे आलो आहोत. आमचे काही बरे वाईट झाल्यास आमच्या सर्व मालमत्तेची वासलात तूच लाव. बोलोनला मोर्डा नावाचा क्रॉमवेलचा हेर- मिलडीचा मुलगा- आहे. बाळ आईइतकेच विषारी आहे. तो जिवंत राहिल्यास इंग्लंडमध्ये आम्हाला निश्चित धोका आहे. शक्यतो लौकर त्याला ठार करणे.''

''अरे, आपण ज्याला भेटायला जाणार आहोत तोच तर हा मोर्डा नाही ना?'' पत्रातील मजकूर ऐकून पार्था म्हणाला.

''खास तोच!'' डार्टा उत्तरला.

''मग मित्रकार्य आधी! बोलोनला जाताच त्याला मुरगळून टाकू!'' पार्था म्हणाला. पण डार्टाला पार्थाचा विचार पसंत पडला नाही. मोर्डाला घेऊन इंग्लंडला जावे

आणि ऑथा व अरामी ह्यांची भेट घेऊन काय ते करावे असे त्याचे म्हणणे पडले. पार्थनेही मग विशेष तक्रार केली नाही.

एके दिवशी संध्याकाळच्या सुमारास डार्टा-पार्था ह्या दुकलीने बोलोन शहरात प्रवेश केला. मोर्डाचा कोठे तपास करावा ह्याचा विचार करीत ते एके ठिकाणी उभे असता काळ्या पोषाखातील एक तरुण आपणाकडे टक लावून पाहात आहे असे त्यांना आढळून आले. डार्टा त्या तरुणाला उद्देशून म्हणतो, ''माझ्याकडे असं टक लावून पाहिलेलं मला खपत नाही.''

''आपण पारीसहून आलात काय?'' त्या तरुणाने निराळाच प्रश्न विचारला.

''होय.''

''मग क्षमा करा हं, पारीसहून मजकडे कोणी विशेष प्रवासी येणार असल्याने मला पारीसहून येणाऱ्या प्रवाशाकडे पाहाण्याचा मोह आवरत नाही.''

''आपणाकडे येणारे प्रवासी कशासाठी येणार आहेत?''

''मजबरोबर ते इंग्लंडला येणार आहेत.''

''आपण मान्शर मोर्डा काय?''

''आपण माझारीनकडून आला काय?''

''होय!''

''मीच मान्शर मोर्डा!''

''प्रवासाची तयारी आहे.''

''आज दोन दिवस मी वाट पाहात आहे.''

''मग चला.''

थोड्याच वेळात डार्टा-पार्थाची जोडी घेऊन एक जहाज इंग्लंडच्या दिशेने प्रवास करू लागले. ऑथा- अरामी राजपक्षाबरोबर गेले तर डार्टा-पार्था लोकपक्षाच्या साहाय्याने प्रवास करू लागले. ते फ्रान्समध्ये असताना बरोबर ह्याच्या उलट परिस्थिती होती.

प्रजेशी झुंजून कंटाळलेल्या इंग्लिश राजाचा तळ इंग्लंड व स्कॉटलंड ह्यांच्या सरहद्दीजवळील दोन नद्यांमध्ये पडलेला होता. हे ठिकाण न्यूकासलपासून जवळच होते. रात्रीचा एक वाजला होता. पहारेवाल्यांच्या हालचालीखेरीज छावणीत सर्वत्र शांतताच होती. राजा तळमळत बिछान्यावर पडला होता. शेजारच्या तंबूत विंटर विचार करीत बसला होता. जवळच ऑथा व अरामी आपापल्या बिछान्यावर पडून होते.

इतक्यात तंबूचा पडदा बाजूला सारून एक दूत आत आला.

''महाराज, क्रॉमवेल आज वस्तीला न्यूकासलला येऊन थडकला आहे.'' तो घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला. ऑथा व अरामी ताडकन् उठून उभे राहिले.

''महाराजांचे सैनिक फितूर करण्याच्या मोहिमेवर तो आला आहे. सर्व स्कॉच लोकांना पैसे देऊन त्याने त्यांच्याकडून सरकारना मदत न करण्याबद्दल वचन घेतलं आहे. स्कॉच सरदारांचा आता आपल्याला काही उपयोग होणार नाही.''

विंटर, ऑथा व अरामी धावतच राजाच्या तंबूकडे आले. ह्या अनपेक्षित बातमीने राजा चांगलाच गोंधळून गेला.

''काही झालं तरी मला वाटतं उजाडण्याच्या आत आपण स्कॉटलंडच्या मार्गाला लागावं. तेथील सरदार लॉर्ड मांटमोर आपला विश्वासघात खास करणार नाही.'' विंटर म्हणाला.

''नको! मला ह्या धडपडीचा आता कंटाळा आला आहे.'' चार्लस् निराश होऊन म्हणाला.

''ह्या स्कॉच लोकांना माझा विश्वासघात करून मला शत्रूच्या स्वाधीन करायचं असेल तर त्यांना तसं खुशाल करूदे!''

''सरकार, आपल्यामागे कुटुंबाच्या प्रेमाचा पाश आहे. आम्ही ही गोष्ट अशी सहजासहजी होऊ देणार नाही.'' ऑथा म्हणाला.

''तुम्ही परकी माणसं माझं इतक्या प्रेमाने रक्षण करू इच्छिता आणि माझे लोक मात्र माझ्या जिवावर उठले आहेत.'' राजा म्हणाला.

''सरकार, मी, माझा मित्र हा अरामी व विंटर असे तिघे आपल्याला ह्या प्रसंगातून निभावून नेऊ शकू. आपण एकदा स्कॉटलंड गाठलं की पुष्कळच काम होईल. बाकी कोणी येवोत अगर न येवोत!'' ऑथा म्हणाला.

सर्वांनाच हा बेत पसंत पडून विंटर घोडे तयार करण्यासाठी निघून गेला. थोड्याच वेळात ही चार माणसे

नदी ओलांडून स्कॉटलंडमध्ये जाण्याला सज्ज झाली. पहाटेची वेळ होती. झुंजूमुंजू दिसू लागले होते. इतक्यात ऑथाची नजर नदीच्या पलीकडे दिसणाऱ्या एका काळ्या रांगेकडे गेली. पहाटेच्या अंधुक प्रकाशात अस्पष्ट दिसणारी ती रांग पाहून ऑथा दचकला. तिकडे बोट दाखवून तो म्हणाला, ''महाराज, ही काळी रांग कसली दिसते आहे?''

''नदीकाठी नेहमीच असं धुकं दिसतं.'' राजा म्हणाला.

''पण काल ते दिसत नव्हतं.'' ऑथा उत्तरला. ''सरकार, घात झाला! हे धुकं नाही. शत्रूने आपल्याला घेरलं आहे.''

''ठीक आहे. होऊन जाऊदे एकदा सोक्षमोक्ष!'' राजा बेपर्वाईने उद्गारला व त्याने आपला घोडा लेव्हीन ह्या स्कॉच सरदाराच्या तंबूकडे फेकला. तंबूची कनात दूर करून राजा सरळ तंबूत शिरला. लेव्हीनबरोबर आणखीही काही स्कॉच सरदार तेथे बोलत बसले होते. राजाला पाहाताच ते सर्वजण चपापून उठून उभे राहिले.

''मी तुम्हाला जाब विचारण्यास आलो आहे!'' राजा त्यांना म्हणाला.

''काय झालं सरकार?'' लेव्हीन म्हणाला.

''काय झालं म्हणून आणि मलाच विचारता?'' राजा संतापाने ओरडला.

''क्रॉमवेल न्यूकासलला आला, त्याने माझा स्कॉटलंडचा मार्ग रोखून धरला आणि इतकं सर्व होईपर्यंत तुम्ही स्वस्थ बसला; नाही, त्याला फितूर झाला? क्रॉमवेलशी करार करून तुम्ही माझा सौदा केलात!''

''सरकारना कोणी तरी खोटी बातमी दिली आहे!'' लेव्हीन चाचरत म्हणाला.

''स्कॉटलंडच्या वाटेवर शत्रू आडवा उभा आहे. मी स्वत: डोळ्यांनी पाहून आलो आहे. शत्रूची फळी फोडून मला वाट करून द्या, म्हणजे झालं. तुमच्या इमानीपणाची शाब्दिक हमी मला काय करायची आहे?''

इतक्यात दोन स्कॉच सरदार पुढे येऊन म्हणाले, ''जुलमी राजापासून देशाचं रक्षण करणं हेच खरं इमान! देशाच्या हितासाठी तुला पकडून द्यायला आम्ही बांधले गेलो आहोत. चार्लस् स्टुअर्ट, तू आमचा कैदी आहेस!'' दोघांनीही राजाला पकडण्यासाठी आपले हात पुढे केले, पण राजापर्यंत ते पोचू शकले नाहीत. ऑथा- अरामीच्या तलवारींच्या सफाईदार फटक्यांनी दोनही सरदार त्याच क्षणी जमीनदोस्त झाले.

''विश्वासघात! ज्या देशात मी जन्मलो त्याच देशाच्या लोकांनी माझा घात केला.'' कपाळावर हात मारून राजा म्हणाला.

''सरकार, उठा. शोक करण्याची ही वेळ नव्हे. काय वाटेल ते करून आपल्याला इथून निसटलं पाहिजे.'' ऑथा म्हणाला.

राजाच्या छावणीत सर्वत्र औदासीन्य पसरले होते. राजाच्या वतीने हालचाल करायला कोणीच फारसे तयार नव्हते. आता चांगले उजाडले होते. त्या चिमुकल्या छावणीला सर्व बाजूंनी क्रॉमवेलच्या सैनिकांचा वेढा पडला होता. काही थोडे लोक राजाच्या वतीने शत्रूची फळी फोडून पार व्हायला सज्ज झाले. इतक्यात वावटळीसारखी शत्रूपक्षाची एक तुकडी त्यांच्यावर येऊन आदळली. त्या तुकडीचा म्होरक्या विंटरने तत्काळ ओळखला.

''तोच तो!'' घाबऱ्या घाबऱ्या विंटर म्हणाला.

राजाच्या लोकांनी शस्त्र खाली ठेवले. कोणीच लढण्यास तयार नव्हते. ऑथा, अरामी व विंटर ह्यांच्याच तलवारी काय त्या चालू होत्या. आपला घोडा विंटरच्या अंगावर घालून टोळीचा म्होरक्या त्याला म्हणाला, ''काकासाहेब, का उगीच धडपडता? तुमचा क्षण भरला आता!''

ठोऽ! मोर्डाच्या पिस्तुलाची गोळी कपाळात लागून तो वृद्ध सरदार धाडकन् खाली पडला. अगदी ह्याच क्षणाला ऑथा व अरामी ह्या दोघांना दोन धटिंगणांनी नि:शस्त्र करून कैद केले.

''कोण, मान्शर डार्टा!'' ऑथा ओरडला.

''चूप! बोलू नकोस. घात होईल!'' डार्टा पुटपुटला व त्याने अरामीलाही न बोलण्याबद्दल खूण केली. पार्थाने अरामीला कैद केले होते. ह्या दोघांना घेऊन मोर्डा आपल्या लोकांनिशी क्रॉमवेलकडे येत असता अकस्मात त्याला ही संधी मिळाली. विंटरला ठार करून त्याने आपला सूड उगवून घेतला. राजाला कैद केले. विंटरचे दोन फ्रेंच दोस्तही त्याच्या हाती लागले, पण डार्टा- पार्थानी त्यांचा कबजा घेतला होता.

डार्टा आपल्या हाती लागलेल्या कैद्याबद्दल मोर्डाजवळ ऐसपैस गप्पा मारीत होता. मोर्डाला त्यामुळे काहीच शंका आली नाही. राजा विंटरच्या प्रेताकडे पाहून अश्रू ढाळीत होता. त्याला उद्देशून मोर्डा म्हणाला, ''महाराज, माझ्या गोळीने त्याचं पुरतं काम केलं आहे. तो आता जिवंत होणार नाही. सेनापती क्रॉमवेल आपलं स्वागत करण्यास सज्ज आहे. तिकडे आता आपण चलावं.''

मोर्डाचे हे क्रूर भाषण ऐकून अरामी हळूच म्हणाला, ''मिलडीचं विष ह्या बाळाच्या अंगात मुरून जास्तच जहरी झालं आहे. त्याचा निकाल तेव्हाच लावायला हवा होता.''

ऑथाने नुसताच एक दीर्घ उसासा टाकला.

●●●

## ८. मोर्डाच्या हातावर तुरी

चार्लस् हाती लागताच प्रजापक्षाच्या विजयाची बातमी सर्वत्र कळविण्यासाठी क्रॉमवेलने दूत रवाना केले. इंग्लिश सैन्याचा मुक्काम न्युकासललाच पडला.

एके दिवशी मोर्डाने डार्टाला गाठले व म्हटले, ''अजून तुम्ही सेनापतींना भेटला नाही? चकमक संपताच त्यांनी तुम्हाला बोलावलं होतं.''

''आम्ही आमच्या कैद्यांसाठी सुरक्षित जागा बघण्याच्या धांदलीत आहो. अहो, प्रत्येकापासून कमीत कमी दोन दोन हजार पिस्टोल मिळण्यासारखे आहेत. कैद्यांची व्यवस्था एकदा लागली म्हणजे मग सेनापतींची गाठ घेऊ नि निरोप मागू!'' डार्टा म्हणाला.

''म्हणजे तुम्ही इतक्यात जाणार की काय?'' मोर्डाने विचारले.

''आमची कामगिरी संपली, क्रॉमवेलची अनुमती मिळताच आम्ही परत आमच्या देशाला जाणार!'' डार्टाच्या ह्या बोलण्याने मोर्डा जरा अस्वस्थ झालेला दिसला. आपला एक मनुष्य डार्टाच्या पाळतीवर ठेवून तो तेथून सटकला व क्रॉमवेलकडे आला.

''कोण, मोर्डा! काय काम आहे?'' क्रॉमवेलने त्याला पाहून विचारले.

''मी आपलं अभिनंदन करण्यासाठी आलो आहे. चार्लस् हाती आला. आज आपण इंग्लंडचे धनी झाला!'' मोर्डा म्हणाला.

''मोर्डा, तू ही फार चांगली कामगिरी बजावलीस.''

''ती पसंत पडली ना आपल्याला?''

''अलबत्!''

''मग माझं एक मागणं आहे!''

''काय?''

''आज दोन फ्रेंच कैदी आपल्या हाती लागले आहेत ते मला पाहिजे आहेत.''

''तुझे कोणी मित्र आहेत काय ते?''

''होय महाराज!''

''सध्या ते कुठे आहेत?''

''माझारीनकडून आलेल्या फ्रेंच दूतांच्या ताब्यात आहेत, त्यांनीच त्यांना कैद केलं आहे नि त्यांच्याकडून काही पैसे काढण्याचा त्यांचा विचार आहे.''

''जा! ते कैदी मी तुला बहाल केले आहेत. त्यांचं तू वाटेल ते कर, जा!'' क्रॉमवेल म्हणाला. मोर्डाचा आनंद गगनात मावेना. तो धावतच डार्टाकडे यायला निघाला.

ऑथा, पार्था, अरामी व डार्टा आता ह्या प्रसंगातून कसे निभावून जावे ह्याचा विचार करीत बसले होते. ऑथा व अरामी ह्यांना वरकरणी ते आपले कैदी असल्याप्रमाणे वागवीत व त्यांच्यावर पहारा वगैरे ठेवून असत. मोर्डाचाही ह्या कैद्यांवर डोळा असल्याने त्याने आपलेही काही पहारेकरी त्यांच्यावर ठेविले होते.

''तुझ्या सूचनेप्रमाणे मी बोलोनलाच ह्या बाळाचं नरडं घोटलं असतं तर फार बरं झालं असतं.'' पार्था अरामीला म्हणाला. इतक्यात खिडकीतून बाहेर पाहात उभ्या

असलेल्या ऑथाने मोर्डा येत असल्याची वर्दी दिली. पार्थाला नीट पहारा करण्यास सांगून डार्टा मोर्डाला गाठण्यासाठी बाहेर आला. मोर्डाचे दोन पहारेकरी बाहेर विसावा घेत पडले होते.

मोर्डा येताच डार्टाने त्याला ''काय पाहिजे?'' म्हणून विचारले.

''आज सकाळच्या चकमकीत तुम्ही जे दोन कैदी पकडले आहेत ते मी माझ्या बिऱ्हाडी घेऊन जाणार आहे.'' मोर्डा म्हणाला.

''ह्य: ह्य: ह्य:'' डार्टा हसून म्हणतो, ''भले महाराज! त्यांना कैद केलं आम्ही आणि आमची ही शिकार तुम्ही आयती लाटणार. खासा न्याय! विंटर चांगला हाती लागला होता त्याचा जीव घेऊन बसलात! दहा पांच हजार पौंड लागले नसते हाती?''

''ते काही असलं तरी मला हे कैदी पाहिजेत! मोर्डा आत जाण्याच्या तयारीने म्हणाला.

''हे पाहा मान्शर, अशी दंगामस्ती करून काही चालणार नाही. हे कैदी असे मी सहजासहजी सोडणार नाही. म्हटलं, पैशाचा प्रश्न आहे हा!'' डार्टा शक्य तितके स्मित तोंडावर आणून म्हणाला.

''खुद्द सेनापती क्रॉमवेल ह्यांनी मला कैदी ताब्यात घेण्याचा हुकूम दिला आहे.'' मोर्डा डार्टाला धमकावण्यासाठी म्हणाला.

''फार छान! कुठे आहे? पाहू बरं हुकूम. मला काय, तुमच्या सेनापतीसाहेबांकडून काढू बक्षिशी!''

मोर्डापाशी लेखी हुकूम कोठे होता? तो म्हणाला, ''एवढंच ना! लेखी हुकूम नि एक हजार पिस्टोल अर्ध्या घंट्यात तुमच्याकडे रवाना करतो. मग तर झालं? द्या तर कैदी माझ्या ताब्यात.'' मोर्डा म्हणाला. निव्वळ पैशासाठी डार्टा हुज्जत घालीत असावा हीच त्याची कल्पना.

''छे छे! मी शिस्तीचा भोक्ता आहे. आधी हुकूम, मग अंमल!'' डार्टा म्हणाला.

''इथे माझी सत्ता चालते. माझ्यासाठी तुम्हाला आपली शिस्त बदलणं भाग आहे.'' मोर्डा खवळून म्हणाला.

''ते मला समजलं.'' डार्टा हसून म्हणाला, ''तुम्ही अजून मला ओळखलं नाही. पार्था!''

''काय मान्शर डार्टा!'' पार्था दारात येऊन म्हणाला.

''मान्शर मोर्डा म्हणतात, तुमची शिस्त बाजूला सारून कैदी घेऊन जाईन!''

''तत्पूर्वी अशा शंभर मोर्डांना स्वर्गाला जावं लागेल.'' पार्था मोर्डाकडे न पाहाताच म्हणाला.

''आम्ही इथे माझारीनचे दूत म्हणून आलो आहोत, नाही?'' डार्टा विचारतो.

''आम्हा फ्रेंच सरकारच्या दूतांना धमकी देणारांना मला जाब विचारायचा आहे.'' पार्थाचा भव्य देह मोर्डाच्या दिशेने चालू लागताच डार्टाने त्याला आवरले. मोर्डा उमगला की लेखी हुकुमाशिवाय कैदी मिळणे शक्य नाही. क्रॉमवेलचा हुकूम व डार्टाच्या तोंडावर फेकण्यासाठी पैसे आणण्यासाठी म्हणून मोर्डा गेला. थोड्याच वेळात तो परत आला. पण पाहातो तो काय? त्याचे पहारेवाले धूळ खात पडले होते व कैदी केव्हाच पसार झाले होते. संतापाने एक किंचाळी फोडून तो बेशुद्ध झाला!

मोर्डाच्या तावडीतून सुटल्यानंतर चौघाही मित्रांनी सरळ जंगलाचा रस्ता सुधारला. पाठलाग होण्याची भीती कमी झाल्यानंतर एके ठिकाणी विश्रांतीसाठी त्यांनी आपले घोडे उभे केले. ''मला वाटतं आता तडक जवळचं एखादं बंदर गाठावं नि एखादं जहाज भाड्याने घेऊन फ्रान्सचा रस्ता सुधारावा.'' डार्टा म्हणाला. तत्काळ पार्थानेही त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

''तुम्ही आपले वाटेला लागा. पण आम्ही मात्र येऊ शकत नाही.'' ऑथा म्हणाला. डार्टाला ऑथाच्या म्हणण्याचा काहीच अर्थ कळेना.

''राजाला वाचविण्याची शक्य ती खटपट करणं आमचं कर्तव्य आहे. आम्ही मुख्यत: त्याच कामगिरीवर आलो आहो.'' ऑथाने खुलासा केला.

''राजाला घेऊन क्रॉमवेल लंडनकडे गेला आहे आणि तिथे त्याची चौकशी करून त्याचा वध करण्याचा त्याचा निश्चय आहे.'' डार्टा म्हणाला.

''मग तर मला इंग्लंड मुळीच सोडता येणार नाही.'' ऑथा निश्चयाने म्हणाला. ''माझ्या जिवाचं मोल देऊनही मी राजाला वाचविण्याचा प्रयत्न करणार आहे.''

''बोलून चालून हा परका देश, इथली भाषा आपल्याला

अवगत नाही, देशाची काडीमात्र माहिती नाही, तुझा हा निव्वळ वेडेपणा आहे, ऑथा!'' डार्टा समजावणीच्या स्वरात म्हणाला.

''मला अवश्य तेवढी इंग्लंडची व इंग्लिश भाषेची माहिती आहे.'' ऑथाचा निश्चय बदलण्याचे चिन्ह दिसेना.

''ठीक आहे! तुझा हट्टच आहे तर सारेच जण ह्या भिकारड्या देशात मरून जाऊ. मरायचंच म्हटल्यानंतर इथे काय आणि कुठे काय?'' डार्टा त्राग्याने म्हणाला.

''सर्वांनी रात्रीचा प्रवास करीत लंडन गाठले. विंटरच्या माहितीने ऑथाची एका राजपक्षीय खाणावळवाल्याची ओळख झाली होती. तेथेच सर्वांनी मुक्काम केला. इंग्लिश पद्धतीचे पोषाख सर्वांनी परिधान केले. प्रतिष्ठित इंग्लिश नागरिक बनून ते लंडनमध्ये वावरू लागले.

आज राजाला लंडनमध्ये आणण्यात येणार होते. दिवस उगवल्यापासून सर्व शहर माणसांनी नुसते फुलून गेले होते. ह्याच गर्दीत हे चौघेही मित्र मिसळले होते. थोड्याच वेळात राजाची गाडी आली. राजाच्या एका बाजूला मोर्डा व दुसऱ्या बाजूला हॅरिसन हे पहारा करीत होते. राजाची लोकसभेपुढे चौकशी होणार असल्याची दवंडीही ह्याच वेळी पिटण्यात आली.

लोकसभेपुढे राजाची चौकशी सुरू झाली, त्या वेळीही लोकांनी अशीच गर्दी करून सोडली. न्यायाधीशांनी राजावरील आरोपांची यादी वाचून दाखविली व त्यावर राजाचे म्हणणे काय आहे? असा सवाल केला. राजाने आपल्या खणखणीत आवाजात उत्तर दिले, ''न्यूकासल मुक्कामी माझा विश्वासघात करून तुम्ही माझा सौदा केला आहे. माझा प्राण घेऊ इच्छिणारे तुम्ही चांडाळ आहा. मी न्यायाधीश म्हणून तुम्हाला मानीत नाही आणि म्हणूनच तुमच्या ह्या प्रश्नाला उत्तरही देत नाही.'' एवढेच बोलून राजा उठला.

राजाला घेऊन पहारेकरी सभागृहातून बाहेर पडले, इतक्यात एका नीच इसमाने राजाच्या अंगावर थुंकण्याचा विक्रम केला. त्याचे हे नीच कृत्य चौघाही मित्रांच्या दृष्टीला पडले. ''एका फार्दिगासाठी स्वत:च्या बापालाही तो असे करण्यास मागेपुढे पाहाणार नाही.'' ऑथा लालभडक होऊन म्हणाला. चौघाही मित्रांनी त्याचा पाठलाग चालू केला. त्या बिचाऱ्याला आपल्यापुढे काय वाढून ठेविले आहे ह्याची काहीच कल्पना नव्हती. कशी बहादुरी केली ह्याच ऐटीत तो आपल्या दोन मित्रांबरोबर हसत खिदळत चालला होता.

काही वेळाने ते त्रिकूट नदीजवळील एका निर्जन गल्लीत शिरले. आपल्या मागून कोणीतरी येत आहे ह्याची कल्पना ह्या ठिकाणी त्यांना आली. थुंकणाऱ्या इसमाची मानगूट चटकन् पकडून डार्टा म्हणाला, ''तू अत्यंत पाजी माणूस आहेस, कैदेतील राजाचा असा उपमर्द करून तू आज आपलं मरण ओढवून घेतलं आहेस!''

त्या मनुष्याने सुटण्याची धडपड केली पण व्यर्थ! त्याचे दोस्त केव्हाच पसार झाले होते. त्याला मारण्यासाठी अरामीने तरवार काढताच डार्टा म्हणाला, ''आपली हत्यारे असल्या क्षुद्र मनुष्यासाठी नाहीत.'' त्याने त्याची मान दाबून पार्थाला खूण केली. तत्काळ पार्थाने आपल्या वज्रमुष्टीचा असा प्रचंड आघात त्याच्या मस्तकावर केला की फट्दिशी त्याची कवटी फुटून त्याचा मेंदू बाहेर पडला.

''ह्याला हेच मरण ठीक!'' डार्टा त्याला धुळीत टाकून म्हणाला.

● ● ●

## ९. चार्लस्‌ची फाशी

खर्रऽ खर्रऽऽ खट् खट्. मध्यरात्रीचा सुमार होता. राजाला ज्या ठिकाणी कैदेत ठेवण्यात आले होते, त्याला लागूनच वधस्तंभ उभारण्याचे काम चालू होते. करवत, रंधा, इत्यादि आयुधांचा कर्कश आवाज ऐकून राजा जागा झाला. आपली ही शेवटची रात्र तरी शांत झोपेत जावी, म्हणून त्याने आपला आवडता हुजऱ्या प्यारी ह्याला बाहेर पहारेवाल्यांकडे विनंती करण्यास पाठविले. प्यारी बाहेर येऊन सुतारांना म्हणतो, ''भल्या माणसांनो, जरा सावकाश

काम केलंत तर महाराजांना जरा तरी शांत झोप मिळेल!''

''बरं बरं, तुझ्या महाराजांना म्हणावं, उद्यापासून शांतच झोपायचं आहे!'' एकजण म्हणाला. त्या माणसाकडे प्यारीने नीट नीरखून पाहिले व तो आत गेला.

''ही गोंगाट करणारी माणसं कोण आहेत असं वाटतं महाराजांना?'' तो राजाला म्हणाला.

''असतील कोणी पोटभरू सुतार!''

''मला वाटतं आपले फ्रेंच स्नेही ऑथा त्यात आहेत.'' प्यारी हळूच म्हणाला.

''आणि ते माझा वधस्तंभ तयार करीत आहेत?''

''त्याचबरोबर भिंतीला चोरून भोक पाडण्याचाही त्यांचा उद्योग चालू आहे.''

इतक्यात भिंतीत एक खुंटी मारण्याच्या निमित्ताने वर चढलेल्या अरामीने खिडकीतून आत पाहिले.

''महाराज, आपल्या वधासाठी नियुक्त केलेला चांडाळ आम्ही नाहीसा केला आहे.'' तो हळूच म्हणाला. ''उद्या ऐन वेळी चांडाळ न आल्याने आपली शिक्षा अंमलात येणार नाही. तेवढीच फुरसत आम्हाला मिळेल. आम्ही आपल्या सुटकेच्या नादात आहोत.''

त्या फ्रेंचांचे आपल्यासाठी चाललेले हे उपद्व्याप पाहून राजाला भडभडून आले. अरामी हळूच खाली उतरून आपल्या उद्योगाला लागला.

राजाच्या शिरच्छेदाची वेळ आगाऊच शहरात कळली असल्याने दुसऱ्या दिवशी राजवाड्याकडे माणसांची नुसती रीघ लागली होती. चांडाळ येणार नाही ही खात्री असल्याने सुतारांनी रात्रभर राबून वधस्तंभ पुरा करीत आणला होता. तक्तपोशीखाली बसून ऑथा अद्यापि काही ठोकाठोकी करीत होता.

इतक्यात वाद्यांचा कर्णकटू आवाज त्याला ऐकू आला व वर वधस्तंभापाशी पावलेही वाजू लागली. ''मी जनतेला उद्देशून थोडेसे बोलणार आहे'' हे राजाचे शब्दही त्याच्या कानी आले. तो स्तंभित झाला.

''माझ्या मृत्यूने देशाचे कल्याण होत असल्यास मी आनंदाने मरायला तयार आहे.'' राजा बोलत होता. ''क्रॉमवेलने कोणीतरी नीच मनुष्य चांडाळ म्हणून ऐन वेळी उभा केला!'' ऑथा स्वत:शी म्हणाला. राजाची सुटका करण्याचा त्यांचा सर्व बेत धुळीला मिळाला. कटाची शंका आल्याने क्रॉमवेलने तडकाफडकी राजाची शिक्षा अंमलात आणण्याचे ठरविले. ऑथाने बाहेर डोकावून पाहिले. चांडाळाने तोंडावर बुरखा घेतला असल्याने त्याचे तोंड दिसणे शक्य नव्हते. राजाने आपली शेवटची प्रार्थना आटोपली व चांडाळाला आपण मरायला तयार असल्याचे सांगितले.

खट्. चांडाळाने आपला परशू चालविला. टप् टप्! तक्तपोशीतून खाली रक्ताचे थेंब पडू लागले. ऑथाचे मस्तक सुन्न झाले. आपला हातरुमाल त्याने त्या रक्तात भिजवून घेतला.

सर्वत्र सामसूम झाल्यानंतर मंडळी खिन्न मनाने बिऱ्हाडाकडे यायला निघाली पण डार्टाचा पत्ता नव्हता. जोराचा हिमवर्षाव सुरू झाल्याने विशेष हुडकाहुडकी न करता त्यांनी बिऱ्हाड गाठले. घरी येताच एखाद्या निस्त्राण मनुष्याप्रमाणे ऑथा मटकन् खाली बसला. ''देव करो आणि असला प्रसंग फिरून आमच्या आयुष्यात कधीही न येवो.'' तो म्हणाला.

इतक्यात घाबऱ्या घाबऱ्या धापा टाकीत डार्टा आत आला.

''ह्या भयंकर देशातून होता होईल तितके लवकर बाहेर पडू या!'' ऑथा त्याला केविलवाण्या स्वराने म्हणाला.

''का, फार घाई दिसते?'' डार्टाने विचारले.

''ज्याच्यासाठी आलो तो राजा तर आज जगातून नाहीसा झाला.'' खालच्या मानेने ऑथा उद्गारला.

''आजचा बुरखेवाला चांडाळ कोण होता, माहीत आहे तुला?''

''मला तर तेच गूढ आहे! क्रॉमवेलला ऐन वेळी हा चांडाळ कोण मिळाला?''

''तो मान्शर मोर्डा होता?''

''मान्शर मोर्डा!'' सर्वजण एकदम आश्चर्याने ओरडले.

''होय! मी आतापर्यंत त्याच्याच पाळतीवर होतो. त्याच्या मकाणाचा पूर्ण पत्ता पाहूनच मग मी इकडे आलो.'' डार्टा म्हणाला.

''फार छान!''

''आज रात्री त्याचा फडशा पाडून नंतर आपला मार्ग

सुधारू!''

रात्री सर्वांनी आपल्या तरवारी कसल्या व बर्फाचा मारा सहन करीत ते डार्टाच्या मागून निघाले. थोड्याच वेळात एका निर्जन ठिकाणी एका झोपडीपाशी येऊन ते उभे राहिले. डार्टाने मोर्डाच्या पाळतीवर ग्रीमाँला ठेविले होतेच. तो त्यांना सामोरा आला. झोपडीच्या खिडकीतून मंद प्रकाश बाहेर येत होता.

''आत किती माणसं आहेत?'' डार्टाने ग्रीमाँला हळूच विचारले.

''दोन!'' ग्रीमाँ उत्तरला, ''एक मोर्डा असून दुसरा ठेंगणा गिड्डेलासा आहे.''

''ऑलिव्हर क्रॉमवेल!'' डार्टा उद्गारला.

डार्टा हळूच झोपडीपाशी आला व आतील संवाद ऐकण्याचा प्रयत्न करू लागला. मोर्डाचे व क्रॉमवेलचे राजाच्या वधासंबंधी काही तरी भाषण चालले होते. थोड्याच वेळात भाषण बंद झाले व क्रॉमवेलही दिसेनासा झाला. डार्टाची खात्री झाली की क्रॉमवेल झोपडीतील एखाद्या चोर दरवाजाने नाहीसा झाला. मोर्डाही अंगावर कपडे लपेटून बाहेर पडण्यास सज्ज झाला. बाहेर लोक सावध होतेच. मोर्डा बाहेर येताच चौघांनीही त्याला एकदम घेरले व फिरून गचांड्या देत झोपडीत नेले.

''मान्शर मोर्डा, एकमेकांविरुद्ध डाव खेळता खेळता आता समोरासमोर गाठ पडली म्हणायची!'' डार्टा त्याला शांतपणाने म्हणाला.

मोर्डाला आश्चर्याचा एवढा धक्का बसला होता की त्याला काय बोलावे हेच कळेना. त्याने सुटकेच्या आशेने इकडे तिकडे पाहिले, पण ह्या गराड्यात आपण पूर्ण निराधार आहोत हे कळायला त्याला विलंब लागला नाही.

''तुमच्या वेषान्तराची कला मोठी और आहे. आपण सकाळीच चांडाळ बनला होता नाही?'' डार्टाला वाटले आपल्या ह्या प्रश्नाने मोर्डा अगदी गारठून जाईल.

''पण आता ती भूमिका आपण घेतली आहे!'' तो खवचटपणाने म्हणाला.

''छे छे! असं मात्र समजू नका हं!'' डार्टा म्हणाला, ''आम्हा चौघांपैकी कुणाशीही द्वंद्व खेळून आपण आपल्या वैराचा निकाल लावून घ्यावा.''

''ह्या हलकटाला हा मान....'' अरामी म्हणाला.

''चूप! त्याचा खून करण्याची जशी आम्हाला इच्छा नाही तशी त्याला जिवंत सोडण्याचीही नाही. तेव्हा ह्यातून सुटण्यास एवढा एकच इलाज!'' डार्टा म्हणाला.

''मला तेवढी भिंतीवरील तलवार घेऊदे मग!'' मोर्डा म्हणाला.

''जरूर!''

मोर्डाने तलवार घेण्यासाठी खुंटीला हात घातला मात्र, खटकन् चोर दरवाजा उघडून मोर्डा भिंतीत गडप झाला. चौघेही मित्र आऽवासून एकमेकांकडे पाहू लागले. ''आता इथून आपल्याला जीव घेऊन पळालं पाहिजे.'' डार्टा म्हणाला. कुमक घेऊन कोणत्या क्षणाला मोर्डा येईल व त्याच्याच सापळ्यात कोणत्या क्षणी सापडण्याचा प्रसंग येईल हे सांगणे शक्य नव्हते. तत्काळ सर्वांनी तेथून काढता पाय घेतला.

●●●

## १०. धडाड् धूम

मोर्डा ह्या चौकडीच्या हातून निसटला तरी स्वस्थ मात्र बसला नाही. चोरवाटेने बाहेर पडल्याबरोबर त्याने बंदराचा रस्ता पकडला. ते चौघेही फ्रेंच इसम फ्रान्सला जाण्यासाठी आता विलंब करणार नाहीत ही त्याला खात्री होतीच. विंटर ज्या गलबतामधून ऑथा-अरामीला घेऊन आला होता त्याचा कप्तान राजपक्षीय असल्याने हे चौघेही त्याच्याच आश्रयाला येणार हे तो ओळखून होता. म्हणून बंदरात येताच प्रथम त्याने त्या गलबताचा तपास केला. त्यात मोर्डाला अधिकच माहिती मिळाली. राजा हाती येताच पळून जाण्यासाठी म्हणून ऑथाने गलबतावरील

सर्व लोकांना तयारीत राहाण्याची सूचना देऊन ठेविली होती. एवढेच काय पण गलबतावर दारूगोळाही सज्ज करून ठेवण्यात आला होता. गलबताचा कप्तान ग्रास्लो किनाऱ्यावर गेल्याची संधी साधून मोर्डाने खलाशांना पैसे देऊन योग्य ती माहिती पैदा केली. एवढेच काय पण एका खलाशाच्या खोलीत आपल्यासाठी जागाही पैदा केली.

त्याच दिवशी रात्री चौघेही मित्र बंदरात आले व तेथील पथिकाश्रमात त्यांनी ग्रास्लोला गाठले. त्यांनी तत्काळ आपल्याला फ्रान्सला नेऊन सोडण्याची त्याला विनंती केली. ग्रास्लोने त्यांना होडीतून गलबतावर नेले व गलबत फ्रान्सच्या दिशेने प्रवास करू लागले. दिवसभर झालेल्या दगदगीने सर्वांना अगदी शिणल्यागत झाले होते. बिछान्यावर अंग टाकताच सर्वांना गाढ झोप लागली.

ऑथाचा नोकर ग्रीमाँ व पार्थाचा नोकर मास्कटाँ अद्यापि जागेच होते. त्यांचा जीव भुकेने व तहानेने व्याकूळ झाला असल्याने कोठेतरी मद्य मिळाल्यास डल्ला मारावा ह्या विचारात ते होते. ''ग्रीमाँ, तहानेने तर जीव व्याकूळ झाला आहे बुवा!'' मास्कटाँ म्हणाला.

''मग टाक समुद्रात उडी आणि ढोस पाणी.'' कातावलेला ग्रीमाँ म्हणाला.

''दारूची तहान कुठे पाण्याने भागते होय?''

''मग बघ हळूच जाऊन त्या कोठारात काही हाताला लागतं का?'' ग्रीमाँ गलबतावरील कोठाराकडे बोट दाखवून म्हणाला. मास्कटाँने चोरी करावी व आपण फुकटचा वाटा उचलावा असा त्याचा साजूक बेत होता. मास्कटाँ तयारदेखील झाला पण इतक्यात काही चाहूल लागल्यामुळे दोघेही मुस्कट मारून गप्प पडून राहिले. दोन व्यक्ती चोरपावलांनी कोठाराकडे येत होत्या. एकीच्या हातात कसलेतरी भेंडोळे होते. दोनही व्यक्ती हळूच कोठारात शिरल्या व थोड्याच वेळात परत आल्या.

''हे पहा, ही वात पाच मिनिटं जळेल, तेवढ्या वेळात सर्व उरकलं पाहिजे.''

''ठीक आहे.''

''बरोबर सव्वा बारा!''

''गलबताच्या उजव्या बाजूला होडी तयार आहे.''

''ठीक आहे.''

ग्रीमाँखेरीज दुसरा कोणी तेथे असता तर तो खास ओरडलाच असता. बोलणाऱ्या व्यक्तींपैकी एक मोर्डा आहे हे त्याला दिव्याच्या मंद प्रकाशात दिसून आले. पण तो काहीएक बोलला नाही.

''ह्या कामात धोका आहे.''

''त्याची तुला काळजी नको. आपण वाचलो म्हणजे झालं ना? बाकीच्या सर्व राजपक्षीयांना आज जलसमाधी देण्याचा माझा निश्चय आहे!''

त्या दोन व्यक्ती नाहीशा होताच ग्रीमाँ हळूच उठला व कोठारात गेला. एका पिपाला भली मोठी वात लावलेली त्याला दिसून आली. दारूच्या कोठाराला आग लावून पळण्याचा मोर्डाचा कावा त्याच्या लक्षात आला. त्याने तत्काळ डार्टाकडे धाव घेतली. डार्टाने ग्रीमाँ व मास्कटाँची हकीकत ऐकून घेतली व आपल्या मित्रांना जागे केले. ''समोरच्या खिडकीतून समुद्रात उडी टाकून आता सुटका करून घेतली पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाही.'' डार्टा म्हणाला. ''खलाशी फितूर झालेले दिसतात.''

''फार थंडी आहे रे!'' अरामी म्हणाला.

''मग बैस इथेच, म्हणजे चांगला शेक मिळेल.'' डार्टा उत्तरला.

मोर्डाच्या तंगड्या त्याच्याच गळ्यात कशा घालाव्यात ह्याचा नक्की निर्णय डार्टाने तत्काळ केला. बरोबर सव्वा बाराला मोर्डा दारूला बत्ती दिल्याशिवाय राहाणार नाही ह्याची त्याला खात्री होती. गुपचुपपणे सर्वांनी ग्रास्लोला घेऊन गलबताच्या उजव्या बगलेला दोराला बांधून सोडलेली होडी गाठली. तेथे उभ्या असलेल्या खलाशाला त्यांनी हूं का चूं करण्यालाही संधी दिली नाही. होडीत उतरताच दोर कापून टाकण्यात आला व गलबतापासून होडी शक्यतो दूर नेण्यासाठी सपासप् वल्ही मारण्यात आली.

जहाज समुद्राच्या लाटांवर हेलकावे खात सावकाश चालले होते.

''मोर्डा आणि त्याचे खलाशी दोस्त आता मोठी मजा चाखतील!'' घोंगट मारून बसलेला अरामी म्हणाला.

समुद्रावर दाट काळोख पसरला असल्याने दूर राहिलेले जहाज आता एखाद्या काळ्या ठिपक्याप्रमाणे दिसू लागले

होते.

''आता लवकरच आपल्याला काहीतरी चमत्कार पाहायला मिळेल.'' डार्टा म्हणाला.

इतक्यात गलबतावर काही हालचाल दिसू लागली. मशाल हाती घेतलेली एक व्यक्ती गडबडीने वावरताना दिसू लागली. बत्ती पेटवून चाललेला तो मोर्डाच होता. तो धावत होडीकडे आला पण मृतवत् पडलेला तो खलाशी पाहून त्याची बोबडी वळली. त्याने दोराला हिसका देऊन पाहिले. होडी घेऊन त्याची सावजे केव्हाच निसटली होती.

मोर्डाने निराशेने कपाळावर हात मारून घेतला. त्याच्या हातातील मशाल गळून पडली, पण लगेच सावध होऊन त्याने समुद्रात उडी टाकली. इतक्यात धडाऽड असा प्रचंड स्फोट झाला व गलबताचे तुकडे हवेत उडाले. काही काळपर्यंत पाण्यावर स्वच्छ प्रकाश पडला व फिरून सर्वत्र शांत झाले.

होडीतील मित्रांना तो भीषण प्रकार पाहून चांगलाच धक्का बसला. प्रत्येकजण खिन्न होऊन न बोलता आपापल्या जागी बसला होता.

''आता मात्र खास सर्व आटोपलं!'' ऑथा म्हणाला.

इतक्यात जणू काही त्याचे म्हणणे खोटे ठरविण्यासाठी अंधारातून हाक आली, ''महाराज, मला वाचवा. जरा हात द्या!''

''मान्शर मोर्डा!'' ग्रीमाँ ओरडला, ''त्याचाच हा आवाज.''

''तोच तो!'' ऑथा उद्गारला.

सर्वजण डोळे फाडफाडून अंधारात समुद्रावर पाहाण्याचा प्रयत्न करू लागले.

''तो पाहा! तो पाहा!!'' ऑथा एकीकडे बोट करून म्हणाला.

एक मनुष्य धडपड करीत पोहत होडीकडे येण्याचा प्रयत्न करीत असताना सर्वांच्या दृष्टीला पडला.

''त्याला परमेश्वराने खास लोखंडाचा बनविला आहे.'' पार्था वल्हे सरसावीत म्हणाला. मोर्डाने पाण्यावर काही हात मारले व तो दीनवाणीने ओरडला, ''दया करा. मला वाचवा, नाही तर मी बुडतो.''

''दुर्दैवी विचारा!'' उदार मनाचा ऑथा उद्गारला.

''वाऽवाऽ जरा एखाद्याने तोंड वेंगाडलं की फुटलाच आमच्या ऑथाला पाझर! पार्था, मार वल्हं!'' डार्टा म्हणाला. ''मरू दे त्याला खुशाल!''

दोन सपाट्यांत होडी मोर्डापासून दूर गेली.

''अरेरे! असं काय करता?'' ऑथा रडकुंडीला येऊन म्हणाला.

''मेहेरबानी करा! दया करा!! मला सोडू नका !!!'' मोर्डा ओरडला.

''अरे जा! पश्चात्तापावर विश्वास ठेवण्याइतके आम्ही खुळे नाही!'' डार्टा म्हणाला.

''माझी बंदूक नाही रे. नाही तर ह्याची ही पिर पिर मी केव्हाच बंद केली असती.'' अरामी उद्गारला.

''महाराज, मला खरोखर पश्चात्ताप होत आहे. मी अजून तरुण आहे. मला मारू नका!'' मोर्डा दीनपणाने याचना करू लागला. बोलता बोलता मोर्डाचे हात मारण्याचे काम चालू होतेच.

''तुझा शेवट असाच झाला पाहिजे'' डार्टा म्हणाला. ''तुझी पातकं भयंकर आहेत.''

''तू असा होडीपाशी तरी ये. एका फटकाऱ्यात तुझ्या मस्तकाच्या चिंध्या करतो.'' पार्था वल्हे वर घेत म्हणाला.

ऑथा ओरडून म्हणाला, ''भल्या गृहस्थांनो, तुम्ही हे काय मांडलं आहे? जरा तरी माणूसकी दाखवाल की नाही?'' तो तत्काळ पुढे झाला व होडीतून वाकून त्याने मोर्डाला हात देण्याची तयारी केली. मोर्डाला आनंद झाला. त्याने आटापीट करून होडीकडे येण्यासाठी हात मारायला सुरुवात केली.

''हा पाहा, मी इथे आहे. माझा हात धरून वर ये.'' ऑथा म्हणाला व त्याने खूप पुढे वाकून मोर्डाला हात दिला. ऑथाचा हात हाती येताच मोर्डा त्वेषाने ओरडला, ''निदान हा एक तरी बळी मिळाला!''

त्याने ऑथाला खसकन् होडीतून पाण्यात ओढले व कमरपट्ट्यातील खंजीर काढून ऑथाच्या मस्तकावर तो आता आघात करणार तोच फट्ट असा आवाज होऊन त्याच्या हातातील खंजीर गळून पडला. पार्थाने मारलेल्या वल्ह्याच्या प्रचंड आघाताने मोर्डाच्या मस्तकाच्या अक्षरश: चिंध्या झाल्या. सर्वांनी काळाच्या दाढेतून वाचलेल्या

ऑथाला वर ओढून घेतले.

''मी आधीपासून सावध होतो. ते बाळ काहीतरी गुण उधळल्याशिवाय राहाणार नाही ह्याची मला खात्री होतीच.'' पार्था म्हणाला.

''शाबास दोस्त! फार नामी कामगिरी केलीस तू आज.'' अरामी म्हणाला.

''ऑथाला आता उठल्या सुटल्या माणुसकी दाखविण्याची लहर येणार नाही.'' डार्टाने मल्लीनाथी केली. थंडीने काकडणाऱ्या ऑथाला पाहून साऱ्यांनाच हसू लोटले.

''मला तुम्ही असं खिजवून मारणार असाल तर मी आपला परत समुद्रात उडी मारतो.'' ऑथा म्हणाला.

''सावध राहा. नाहीतर अजूनही मोर्डा तुझ्या उरावर बसेल तेथे.'' डार्टा उद्गारला.

सकाळच्या वेळी त्यांना एक जहाज दिसले. सर्वांनी आरडाओरडा करून, वल्ही नाचवून, टोप्या उडवून, जहाजावरील लोकांचे लक्ष आपणाकडे वेधून घेतले. जहाज फ्रेंच असल्याने त्यांची तत्काळ सुटका झाली व लवकरच सर्वजण सुखरूपपणे बोलोनला येऊन पोचले.

●●●

## ११. डार्टाची अटक आणि ऑथाची फसगत

बंदरात उतरताच, एखाद्या पथिकाश्रमात मुक्काम टाकून जरा चैन करावी असे पार्थाच्या मनात फार होते. पण बंदरात उतरल्यापासून प्रत्येकजण आपल्याकडे संशयी नजरेने पाहात असावा अशी सर्वांनाच शंका आल्याने त्यांना आपला बेत बदलणे भाग होते.

''इथे राहाता येत नाही तर नाही, पण सर्वजण मिळून पारीसला तरी जाऊ.'' पार्था म्हणाला. पण एकत्र प्रवास करणे डार्टाला पसंत पडले नाही. तो म्हणाला, ''माझारीनने मला व पार्थाला क्रॉमवलेकडे पाठवलं आणि आम्ही तर क्रॉमवेलच्या विरुद्ध उचापती केल्या. तशातच ऑथा व अरामी ह्यांच्याबरोबर जर आपण सापडलो तर तो नक्कीच आपली वाट लावील. तेव्हा आपण विभक्तपणेच प्रवास करावा हे बरं.'' ऑथाला एकत्र प्रवास करणेच पसंत होते पण डार्टा अनुकूल नसल्याने त्याने विशेष ओढून धरले नाही.

''पण मी म्हणतो, इंग्लंडमध्ये आपण काय भानगडी केल्या हे माझारीनला आता सांगणार कोण? मोर्डाचा तर निकाल लागला!'' पार्थाने शंका काढली.

''बाबा रे क्रॉमवेल जिवंत आहे ना अजून. त्याला काही अज्ञात नाही. माझारीनकडे एव्हाना त्याने आपल्या विरुद्ध कागाळी केलीही असेल.'' डार्टा म्हणाला, ''माझारीनची प्रत्यक्ष गाठ पडून त्याची कशीतरी बोळवण करीपर्यंत आपल्याला सावधच राहिलं पाहिजे.'' शेवटी ऑथा व अरामी ह्यांनी पारीसचा रस्ता धरला व डार्टा- पार्था माझारीनकडे जाण्यासाठी निघाले.

राजकुमार व राणी पारीसमधून निघून गेल्यापासून पारीसचे एकंदर स्वरूप पार बदलून गेले होते. लोकपक्षीय पुढाऱ्यांनी शहर ताब्यात घेतले व लोकसभेमार्फत एक शिष्टमंडळ पाठवून राणीला राजधानीला परत येण्याची विनंती केली. राणी परत तर आली नाहीच पण उलट शिष्टमंडळाला धमकी देऊन तिने कळविले की बऱ्या बोलाने ब्यूफोर वगैरे लोकपक्षीय पुढारी शरण आले नाहीत तर पारीसवर स्वारी करून त्यांची खोड मोडण्यात येईल. ह्या धमकीचा परिणाम मात्र भलताच झाला.

''माझारीन देशाचा शत्रू असून, त्याला राणीने आठ दिवसात हद्दपार करावे.'' असा ठराव लोकसभेने केला व पारीस लढविण्याची तयारी केली. इंग्लिश राज्यक्रांतीच्या बातमीने तर लोकांचे अवसान चांगलेच वाढले. पारीसची संपूर्ण नाकेबंदी करण्यात येऊन रस्तोरस्ती खंदक काढण्यात आले.

ऑथा व अरामी पारीसच्या वेशीपाशी आले. पण त्यांना आत सोडणार कोण? आपण मध्यंतरी इंग्लंडात असल्याने आपल्याला ह्या नव्या घटनांची काही एक माहिती नाही, वगैरे त्यांनी खूप सांगितले. पण ओळखीशिवाय आत सोडण्याचे चौकीदारांनी साफ नाकारले.

इतक्यात एक अधिकारी ताड् ताड् करीत तेथे आला.

''कोण, प्लाँशे! अरे काय रुबाब आणला आहेस हा!'' अरामी ओरडला.

तो प्लाँशे होता. त्याने तत्काळ अरामी व ऑथा ह्यांना आत सोडले व डार्टाची चौकशी केली. ऑथाने डार्टा-पार्था माझारीनकडे गेल्याचे त्याला सांगताच प्लाँशे दातओठ खाऊन म्हणाला, ''त्या थेरड्याने त्यांना दगा केला आहे. मान्शर ऑथा, तुम्ही दोन दिवस वाट पाहून त्यांच्या तपासाला जा! माझारीनने त्यांना तुरुंगात टाकल्याची बातमी आहे. जरूर लागली तर मलाही बोलवा.''

प्लाँशेचे भाषण ऐकून ऑथा व अरामी चकित झाले. त्याचबरोबर डार्टाच्या हुशारीचे त्यांना कौतुकही वाटले. ''बोलोनला डार्टाने केलेला अंदाज खरा ठरला म्हणायचा.'' अरामी म्हणाला.

''डार्टाच्या बुद्धिमत्तेला तोड नाही. दुर्दैव त्याचं, तो असल्या घाणेरड्या राजवटीत जन्माला आला आहे.'' ऑथा उत्तरला.

दोन दिवस सोडून तीन चार दिवस त्यांनी डार्टा-पार्थासाठी पारीसमध्ये वाट पाहिली पण त्यांचा काहीच पत्ता न लागल्याने ऑथा सेंटजर्मेनकडे जाण्यास तयार झाला. राणीची प्रत्यक्ष गाठ घेऊन डार्टासंबंधी काही उलगडा झाल्यास पाहावा असा त्याचा विचार होता. आपल्यालाही काही दगा फटका झाल्यास मागे काहीतरी हातपाय हलवायला जागा राहावी म्हणून अरामीने नुसते ऑथाच्या पाळतीवर राहावे असे ठरले. सेंटजर्मेनला गेल्यानंतर राणीची गाठ घ्यायला ऑथाला फारशी अडचण पडली नाही. राणी ज्या दिवाणखान्यात होती तेथेच माझारीनही एखाद्या कारकुनाप्रमाणे काही कागदपत्रे चाळीत बसला होता.

''माझे दोन मित्र डार्टा व पार्था माझारीननी काही कामाकरिता इंग्लंडला पाठविले होते, ते फ्रान्समध्ये परत आल्यापासून त्यांचा काही एक पत्ता नाही.'' ऑथा राणीला उद्देशून पण माझारीनला ऐकू जाईल अशा बेताने म्हणाला.

''मग तुमचं काय म्हणणं आहे?'' राणीने विचारले.

''मी त्यांची काही वार्ता कळेल ह्या आशेने आलो आहे.''

''चुकलेल्या माणसांचा तपास करण्याचं काम पोलीसांचं आहे, राणीचं नाही.'' राणी तोऱ्याने फणकारली.

''राणीसाहेबांनी माझारीनकडे चौकशी केल्यास माझं काम होईलसं वाटतं. ह्या बाबतीत पोलीस काही करू शकतीलसं वाटत नाही.''

''मग तुम्हीच हा प्रश्न त्यांना विचारावा हे उत्तम!'' राणी झटक्याने म्हणाली.

''हा प्रश्न डार्टासंबंधी असल्याने राणीसरकार त्यात विशेष लक्ष घालतील ह्या आशेने मी आपल्याला विनंती केली होती एवढंच!''

इतक्यात माझारीन स्वत:च पुढे आला व म्हणाला, ''ही गोष्ट राणीसरकारना माहीत असण्याचं कारण नाही. डार्टानी हुकूम अमान्य केल्याने ते आपल्या मित्रासह सध्या अटकेत आहेत.''

माझारीनकडे लक्ष न देता ऑथा राणीला म्हणाला, ''त्यांची अटक रद्द व्हावी असा हुकूम मिळावा अशी माझी सरकारना विनंती आहे.''

''हा शिस्तीचा प्रश्न आहे.'' राणी म्हणाली.

''वीस वर्षांपूर्वी आपल्यासाठी प्राण धोक्यात घालणाऱ्या डार्टासंबंधी राणीसाहेब हे उत्तर देत आहेत!'' ऑथा शक्य तितका शांतपणाचा आव आणीत म्हणाला व जाण्यासाठी परत वळला.

''तुम्हीसुद्धा डार्टांच्याबरोबर ह्या खेपेला इंग्लंडला गेला होता काय?'' माझारीनने विचारले.

''ह्या प्रश्नाचं उत्तर मी दिलंच पाहिजे असं मला वाटत नाही.'' ऑथा मागे न पाहाताच म्हणाला. खाली चौकात राणीला भेटण्यासाठी आलेल्या अनेक लोकांची गर्दी जमली होती, तिकडे पाहात तो चालला असता त्याच्या खांद्यावर कोणीतरी हात ठेविला.

''कोण कार्मिंग?''

''होय काउंट ऑथा!''

''काय काम आहे?''

''मला आपल्याला अटक करण्याचा हुकूम झाला आहे.''

''ठीक आहे! अरामी सावध, मी अडकलो!!'' ऑथा ओरडला.

ऑथाची ही गर्जना खाली गर्दीत वावरणाऱ्या अरामीच्या कानी गेली. त्याने हळूच तेथून काढता पाय घेतला.

''ह्या चौघांपैकी तीन हाती लागले, चौथाही लवकरच मिळेल. मग ही जुनी आठवण काढून ते वारंवार राणीसाहेबांना त्रास देऊ शकणार नाहीत. मी त्यांना स्वत: माझ्या देखरेखीखाली कैदेत ठेवणार आहे.'' राणीला शांत करण्याचा प्रयत्न करीत माझारीन म्हणाला.

राणीने एक दीर्घ सुस्कारा टाकला व ती म्हणाली, ''पण ते कैदेत टिकले तर ना?''

माझारीन सेंटजर्मेनला राणीला भेटण्यासाठी येई, तरी पण त्याने आपला स्वतंत्र असा मुक्काम रुईच्या किल्ल्यात टाकला होता. राणीचा निरोप घेऊन रुईला जाण्यासाठी तो आपल्या गाडीत चढला. गाडीबरोबर पहाऱ्यासाठी म्हणून त्याने अनेक घोडेस्वार घेतले होते. सर्वांच्या मागून कार्मिंग व ऑथा घोड्यावरून येत होते. ऑथाभोवती सशस्त्र स्वारांचा गराडा होताच. लोकांच्या गर्दीत मिसळून अरामी व ग्रीमाँ हा सारा देखावा पाहात होते. रुईच्या किल्ल्यात पोचताच कार्मिंगने ऑथाला कोठे ठेवायचे ह्यासंबंधी माझारीनकडे विचारणा केली. डार्टा व पार्था ह्यांना जेथे ठेवण्यात आले होते त्याच्या अगदी विरुद्ध दिशेस असलेल्या आपल्या निवासस्थानापाशी माझारीनने ऑथाची व्यवस्था करण्यास सांगितले. रुईचा किल्ला खरा तुरुंग नसल्याने स्थानबद्धतेखेरीज तुरुंगवासाची खरी जाणीव होण्याजोगे तेथे काहीच नव्हते. माझारीनच्या पहाऱ्यात अडकून पडणे एवढाच त्याचा अर्थ होता, पण स्वतंत्र वृत्तीच्या ह्या तीन शिलेदारांना हेही परवडणे शक्य नव्हते. डार्टा-पार्थाची प्रत्यक्ष दृष्टिभेट होणे अशक्य झाल्याने ऑथाने आपली हकिकत त्यांच्या कानावर घालण्याची कार्मिंगला विनंती केली व कार्मिंगनेही ती मानली.

डार्टा आणि पार्था ह्यांना कैद करून किल्ल्यात आणून ठेविल्यापासून दोघांचीही स्थिती मोठी चमत्कारिक झाली होती. डार्टा संतापाने वाटेल त्याच्यावर तोंड सोडी तर पार्था डोळे मिटून कोपऱ्यात पडून राही. बॅरन होण्यासाठी माझारीनकडे तो आला व कैदेत पडला. त्याची ही अवस्था व्हायला आपणच कारणीभूत झालो असे डार्टाला वाटत असल्याने तर त्याचे मन त्याला फारच खाई. सायंकाळची वेळ होती. खोलीच्या खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाकडे पाहात गजाला धरून डार्टा उभा होता. थोड्या वेळाने तो एकदम पार्थाकडे आला व त्याला गदगदा हालवून म्हणाला, ''ए गृहस्था! तुझी झोप संपणार तरी केव्हा? चार दिवस झाले आज, पाहातो आहे, सारखा झोपा काढतो आहेस. सूर्य उगवतो आहे, मावळतो आहे, तू आपला स्वस्थ!''

''मग मी काय तुला नको म्हटलं आहे?''

''एखाद्या पहारेवाल्याचा आता मुडदा पाडूया नि पाहूया काही जमतं का!''

''आणि जर काही चाहूल लागली तर पडूया अंधारकोठडीत!''

''तेही खरंच म्हणा!''

''आपले खाण्यापिण्याचे तर काही हाल नाहीत ना इथे?''

''वाऽ म्हणजे खायला मिळालं तर इथेच कायमचा मुक्काम टाकण्याचा तुझा विचार दिसतो आहे मला!''

इतक्यात त्यांचे भोजन घेऊन कार्मिंग आला. अन्न मेजावर व्यवस्थित ठेवून पहारेवाला निघून जाताच कार्मिंग म्हणाला, ''मान्शर डार्टा, मी तुम्हाला आज एक आनंदाची बातमी सांगणार आहे.''

''माझारीनचा कोणी खूनबीन केला काय?''

डार्टाच्या ह्या प्रश्नाने कार्मिंगला हसू लोटले. तो म्हणाला, ''भले महाराज! नाही म्हटलं तुमचे दोस्त ऑथा.....''

''काय तुम्हाला भेटला होता?''

''जरा दमाने घ्याल का?''

''बरं. तो खुशाल आहे ना?''

''अगदी खुशाल! तुमच्याप्रमाणेच तेही माझारीनचा पाहुणचार घेत आहेत सध्या!''

''ऑथा इथे कैदेत आहे?'' पार्था ओरडला.

''ऑथाला कैद? कशासाठी?'' डार्टा ओरडला.

''तुम्हाला जे कारण तेच त्यांना! माझारीनच्या राजवटीत आहोत आपण.'' माझारीनचा विश्वासू (?) नोकर कामिंग म्हणाला.

डार्टा निराशेने मटकन् खालीच बसला.

''निराश होण्याचं कारण नाही, मान्शर डार्टा.'' कामिंग त्याचे सांत्वन करू लागला.

''तुम्ही माझा एक निरोप ऑथाला कळवाल का?'' डार्टाने विचारले.

''कोणता तो?''

''त्याला म्हणावं, आम्ही इथे कसेतरी दिवस कंठीत आहोत.''

''एवढंच ना?''

''एवढंच!''

कामिंग त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडताच डार्टाने पार्थाला जवळ जवळ मिठीच मारली.

''सबूर, सबूर, मेरे दोस्त!'' डार्टाचा आनंद पाहून विस्मित झालेला पार्था ओरडला.

डार्टाच्या आनंदाचे कारण मात्र त्याला काहीच उमगले नाही.

''ए पार्था, आपण इथून आता खास सुटलो म्हणूनच समज!''

''ते कसं काय बुवा?''

''आधी खादीला बस बघू. पोटभर खाऊन तरी घेऊ. मग सांगतो तुला काय करायचं ते.''

दोघेही मेजावरील खाद्यपदार्थांवर तुटून पडले.

●●●

## १२. सुटका!

रुईच्या किल्ल्यातील बहुतेक सर्व शिबंदी स्विस लोकांचीच होती. डार्टा व पार्था ह्यांच्यावर दोन शिपायांचा पहारा असे. रात्रीची वेळ होती. थंडी म्हणजे मी म्हणत होती. पहाऱ्यावरील दोन शिपायांपैकी एक कोठे झुकला होता कोणास ठाऊक! दुसरा बिचारा थंडीने कुडकुडत बाहेर येरझारा घालत होता. पार्थाने खिडकीचा एक गज आपल्या प्रचंड सामर्थ्याने केव्हा उपटून काढला तेही त्याच्या ध्यानी आले नाही.

''काय रे दोस्त, मद्याचे दोन घोट घेणार का?'' डार्टाने त्या कुडकुडणाऱ्या पहारेवाल्याला विचारले. ह्या राजेशाही कैद्यांचा त्या भाडोत्री पहारेवाल्यांना नेहमीच हेवा वाटे. डार्टाच्या ह्या आमंत्रणाने तो खूश झाला व मोठ्या आनंदाने आत आला. तत्काळ पार्थाचा गज त्याच्या डोक्यात बसला व हूं का चूं न करता त्याने तेथेच लोळण घेतली. हां हां म्हणता डार्टाने त्याचा पोशाख चढविला व हत्यारे घेऊन पार्थाच्या खोलीवर पहारा सुरू केला. इतक्यात दुसरा पहारेकरी आला, त्याला आपल्या दोस्ताची काय अवस्था झाली आहे ह्याची काहीच कल्पना नसल्याने डार्टालाच आपला दोस्त समजून तो मोठ्या खुशीत जवळ आला. तत्काळ डार्टाने त्याच्यावर झडप घातली व पार्थाचा गज त्याच्याही मस्तकावर आदळला. पार्थाने त्याचे कपडे व हत्यारे ताब्यात घेतली. ह्या दोन्ही पहारेकऱ्यांना खचाटून व त्यांच्या तोंडात बोळे देऊन आणि कोठडीत अंधार करून पार्था व डार्टा पहारेकऱ्याच्या पोषाखात निश्चिंतपणे बाहेरील चौकात आले. इकडे माझारीन हातात कंदील घेऊन बाहेर पडलेला त्यांना दिसला. किल्ल्यात कोठेतरी एकान्तात बसून रात्रीच्या वेळी माझारीन विचार करीत असतो अशी आख्यायिका त्यांनी ऐकलीच होती. माझारीनची ही काय भानगड आहे त्यावर पाळत ठेवण्याचे डार्टा-पार्थानी ठरविले व गुपचुपपणे त्याचा पाठलाग सुरू केला. एका विवक्षित ठिकाणी येऊन माझारीनने एक दार उघडले व आत जाऊन दार फिरून बंद करून घेतले.

डार्टाने दाराला कान लावून पाहिला पण काहीच हालचाल ऐकू आली नाही. शेवटी पार्थाच्या खांद्यावर उभे

राहून त्याने दारावरून आत खाली डोकावले. ह्या ठिकाणी उघडी जागा असून आत झाडांच्या बऱ्याच कुंड्या ठेवलेल्या होत्या. एका विवक्षित कुंडीपाशी येताच माझारीनने ती कुंडी उचलली व कुंडीखाली असलेल्या विवरात प्रवेश केला. थोड्याच वेळात चण् चण् असा नाणी मोजल्याचा आवाज डार्टाच्या कानी आला. ''अरे थेरड्या, एकान्तात तुझा हा विचार चालतो काय?'' डार्टा पुटपुटला. थोड्याच वेळात माझारीन वर आला. डार्टा-पार्था झटकन् दूर होऊन दडून बसले. माझारीनने मग ऑथाच्या खोलीकडे मोर्चा वळविला. झाडाआडून लपत छपत डार्टा-पार्था त्याच्या मागे होतेच. ऑथाच्या खोलीपाशी येताच माझारीन जरा घुटमळल्यागत झाला. पण त्याला काय वाटले कोणास ठाऊक, दार न उघडताच तो परत फिरला. ऑथाच्या खोलीची किल्ली त्याने स्वत:पाशीच ठेविली होती. तो घरी जाण्यासाठी वळणार इतक्यात डार्टा-पार्था त्याच्या दोन बाजूंनी पुढे आले. डार्टा त्याला अदबीने म्हणाला, ''महाराजांनी आता जातीने तसदी घेण्याचं काहीच कारण नाही. पाहिजे असेल तर हा बंदा नोकर ऑथाला खोली उघडून देत आहे.''

डार्टाला पहारेवाल्याच्या वेषात समोर पाहाताच माझारीनची बोबडीच वळली.

''कोण मान्शर डार्टा!'' तो अर्धवट शब्दांत पुटपुटला.

''होय महाराज. मीच तो.'' नम्रतेचा भलताच आव आणीत डार्टा म्हणाला. ''आणि हे माझे स्नेही मान्शर पार्था! महाराज आता काउंट ऑथाच्या भेटीस चालले होते नाही? मग महाराजांनी परत फिरण्याचं कारण नाही. चलावं तिकडेच. आम्ही येत आहोतच बरोबर सोबतीला!''

आपला गुप्त द्रव्यसंचय ह्या डाकूंनी पाहिला की काय अशी शंका प्रथम माझारीनला आली होती, पण डार्टाच्या बोलण्यावरून त्याला खात्री वाटली की ऑथाच्या खोलीपाशीच फक्त ते राखुळत असावेत आणि त्यामुळे त्याला एक प्रकारे समाधान वाटले.

''कमाल आहे तुमच्या हुशारीची! तुमच्या ह्या हिकमतीवर खूश होऊन मी तुम्हाला मुक्त केलं आहे!'' माझारीन कसे बसे स्वत:ला सावरून म्हणाला.

''ही आमच्यावर मोठीच मेहरबानी आहे!'' डार्टा म्हणाला, ''पण आम्हाला मुक्त करण्याचं आता आपल्या हाती कुठे राहिलं आहे म्हणा!''

''म्हणजे?'' माझारीन जरा बिचकून म्हणाला.

''म्हणजे नाही नि बिणजे नाही, तुम्ही आता आमच्या तावडीत आहा, जरा गडबड झाली तर नरडं घोटून टाकू म्हटलं.'' डार्टा गुरगुरला.

''आपल्याला आता आमच्या हातून स्वातंत्र्य मिळवायचं आहे नि त्यासाठी योग्य तो मोबदला मोजायचा आहे.'' पार्था तहाच्या गोष्टी बोलू लागला.

पार्थाचे हे भाषण ऐकून मात्र सर्रकन् माझारीनच्या अंगावर काटाच उभा राहिला. त्याने डोळे फाडफाडून डार्टाकडे पाहून त्याच्या अंत:करणाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला पण डार्टा अगदी निर्विकार मुद्रा करून उभा होता.

''स्वातंत्र्याबद्दल मोबदला म्हणता? काय पाहिजे आपल्याला?'' माझारीन तहाच्या अटी हुडकण्याचा प्रयत्न करू लागला.

''ते आम्ही अजून कुठे ठरवलं आहे? त्या बाबतीत ऑथाचा सल्ला घ्यावा लागेल. चलावं आपण तिकडे.'' डार्टा किंचित् हुकमी आवाजात म्हणाला. माझारीन जरा घुटमळू लागताच डार्टा पुढे म्हणाला, ''महाराज, आम्ही शक्यतो आपला मान ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत पण आपण जर का निसटण्याचा अगर आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केलात तर मात्र नाइलाज म्हणून आम्हाला आपली वाचा कायमची बंद करावी लागेल!''

''नाही! नाही!! मी तसं काहीच करणार नाही!!!'' माझारीन म्हणाला आणि त्याने मुकाट्याने ऑथाच्या खोलीचे कुलूप काढले.

हे सर्व लटांबर एकदम खोलीत शिरल्याचे पाहून ऑथा चकितच झाला. ''म्हणजे ह्याचा अर्थ तरी काय?'' तो म्हणाला.

''ह्याचा अर्थ जरा वेळ बदलली आहे. आता मी तुमचा कैदी आहे. तुम्ही माझे नाही.'' माझारीन म्हणाला. ''पण लक्षात ठेवा, हे फार वेळ चालणार नाही. मी न बोलावताही कदाचित् माझी माणसं इथे येऊ शकतील.''

''हां महाराज, ही दमदाटी बरी नाही! आम्ही किती सौम्यपणाने आपल्याशी वागत आहोत, पाहिलंत ना?

आपण आपला संताप आवरलात तर मला वाटतं अधिक बरं होईल.'' डार्टा म्हणाला.

''मी मित्र म्हणूनच तुम्हाला सांगतो आहे.'' माझारीन बोलू लागला, ''बाहेर चौफेर सशस्त्र शिबंदीचा पहारा असताना तुम्ही कसे निसटणार आहात तेच मला कळत नाही. एक तासाच्या आत फिरून तुम्ही अटकेत पडाल नि मग पस्तावाल. ह्याचा सूड म्हणून तुम्ही आताच माझा जीव घेणार असाल तर निराळं. नाही तर मी तुम्हाला मोकळे सोडून देण्याची हमी घेतो. मला सोडा कसे!''

''छे, छे! एकदा तुम्ही इथून निसटलात की पाच मिनिटात आम्हाला तळघराची हवा दाखवाल!''

''पण मी तुम्हाला वचन देतो ना! माझ्या वचनावर तुमचा विश्वास नाही?''

''आमचा त्याला इलाज नाही. सध्या आहे ते खरं. ह्यात काही गडबड झाली तर मात्र आपण सारेच मरू म्हणजे झालं.'' डार्टाचा हा निश्चय ऐकताच माझारीनचे पायच लुले पडले. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. तो गयावया करून म्हणाला,

''थांबा, ह्या बोळाच्या शेवटी एक दरवाजा आहे, त्यातून बाहेर पडून मोकळ्या पटांगणातून सरळ पुढे गेलात म्हणजे तट लागतो. तुम्ही तटावरून उड्या मारून पलीकडे सहज जाऊ शकाल व स्वतंत्र व्हाल. शिवाय तुमच्यापाशी हत्यारंही आहेतच. त्या दरवाजाची किल्ली मजपाशी आहे. ही घ्या!''

''हां, ठीक आहे.'' डार्टा म्हणाला, ''पण तेथपर्यंत तुम्ही आमच्याबरोबर आलंच पाहिजे.''

''तुम्हाला शंका असेल तर मी जरूर तुमच्याबरोबर तटापर्यंत येतो; मग तर झालं?'' थोडक्यात प्रकरण निभण्याचे चिन्ह दिसताच माझारीन उसने अवसान आणून म्हणाला.

सर्व मंडळी तटापाशी येताच आठवण झाल्यासारखे करून डार्टा एकदम म्हणाला, ''खरचं महाराज, पण ऑथा अद्यापि नि:शस्त्र आहे. त्याला द्यायसाठी एखादं हत्यार पाहिजे, ते कुठे मिळेल बरं इथे?''

''त्यात काय अवघड आहे?'' पार्था म्हणाला, ''माझारीनच्या कंबरेला असलेल्या तरवारीचा त्यांना काय उपयोग आहे? देतील ना ते ऑथाला ती?''

मनात नसतानाही माझारीनला मोठी खुशी दाखवून तरवार ऑथाला द्यावी लागली. नंतर हां हां म्हणता तटावरून पलीकडे उडी मारून ऑथा दिसेनासा झाला. माझारीनवर नीट नजर ठेवण्यास पार्थाला सांगून डार्टा तटावर चढून बसला. ''आता पुढे?'' पार्थाने खालून विचारले. ''पुढे काय? माझारीनना नीट उचलून इकडे वर दे. त्यांनी गडबड केली तर मात्र मुळीच गय करू नकोस!'' डार्टाने फर्माविले. आता मात्र माझारीनची पुरतीच गाळण उडाली. तो ओरडणार इतक्यात त्याचे पाय अंतराळी झाले. आपण तटावर डार्टापाशी केव्हा येऊन पडलो हेही त्याला समजले नाही. पार्थाच्या राक्षसी शक्तीचा हा मासला अनुभवाला येताच माझारीनची दातखीळ बसली.

''महाराज, आता मुकाट्याने इथून उडी मारून पलीकडे ऑथाच्या स्वाधीन व्हा, नाहीतर मी इथल्या इथे....''

माझारीन लटलट कांपत म्हणाला, ''तुऽतुऽऽतुम्ही व ऽऽ व ऽऽ वचन मोडत आहा!''

''कबूल. पण भुयारातल्या खजिन्याची काय वाट? त्याबद्दल आपलं बोलणं अद्यापि कधी झालं आहे!'' डार्टा म्हणाला. खजिन्याची गोष्ट निघताच माझारीन पुरता चीत झाला. डार्टाने त्याला बकोटीला धरून खाली सोडताच ऑथाने त्याचा कबजा घेतला. तत्काळ डार्टा व पार्थाही पाठोपाठ खाली आले. जवळच काही घोडे उभे असलेले दिसताच डार्टा तिकडे वळला. पण इतक्यात त्याला कोणीतरी दरडावले,

''खबरदार! घोड्याला हात लावाल तर ठार झालाच म्हणून समजा!!''

''कोण ग्रीमाँ!'' दरडावणाऱ्या व्यक्तीचा आवाज ओळखून ऑथा म्हणाला.

ग्रीमाँने तत्काळ चौघांनाही ओळखले. दुसरीकडे टेहळणीवर असलेल्या अरामीला ही आनंदाची वार्ता सांगण्यासाठी तो धावतच सुटला.

थोड्याच वेळात ऑथा, पार्था, अरामी व डार्टा ही चौकडी एकत्र जमली. फ्रान्सचा दुर्दैवी प्रधान माझारीन आज त्यांच्या तावडीत सापडला होता.

●●●

## १३. राणीची सही व लोकपक्षाचा विजय

माझारीनचा योग्य इतमाम ठेवून त्याला आपल्या ताब्यात कसे ठेवावे हा चौघांच्या पुढे प्रश्न होता. शेवटी पार्थाच्या भव्य प्रासादात माझारीनची सोय करण्याचे सर्वानुमते ठरले व मंडळी तिकडे रवाना झाली. एका भव्य दिवाणखान्यात माझारीनला ठेवण्यात आले. त्याच्या खाण्यापिण्याची सोय एखाद्या राजाप्रमाणे करण्यात आली होती. सर्वत्र स्थिरस्थावर होताच ह्या सर्व मित्रांना उद्देशून माझारीन म्हणाला, ''मला इथे छपवून ठेवण्याचा तर तुमचा उद्देश नाही ना?''

''छे छे महाराज!'' डार्टा उत्तरला, ''उलट आपला मुक्काम इथे असल्याचं आम्ही जाहीर करणार आहोत!''

''मग लवकरच तुमच्या भोवती लष्करचा वेढा पडल्याशिवाय राहाणार नाही!''

''ती गोष्ट आमच्या लक्षात आहे, म्हणूनच पारीसहून लोकपक्षाचं सैन्य आम्ही आपल्या संरक्षणासाठी बोलावणार आहोत. राजपक्षीय सैनिकांशी दोन हात करण्याची त्यांना जरा खुमखुमी आहे. होऊन जाऊद्या!''

''राजपक्षाचं बल तुम्हाला माहीत आहे ना? लोकपक्षाचा हां हां म्हणता बीमोड होईल.''

''तसं दिसलं तर आपल्याला उचलून आम्ही लगेच दुसरीकडे नेऊ त्याबद्दल आपण निश्चिंत असावं.''

''समजलो! समजलो!! हे पाहा, आता काहीतरी तडजोडीचं बोलणं काढा. मी तुमचा शत्रू थोडाच आहे!'' हे ठग पक्के आहेत हे ओळखून माझारीन म्हणाला.

''छे छे महाराज,'' विनयाचा आव आणून डार्टा बोलू लागला, ''आम्ही आपले मित्र आहोत ह्याबद्दल आपणाला.....''

''पुरे! पुरे!! तुम्हाला काय पाहिजे ते एकदा चटकन् सांगा बरं, उगीच आढेवेढे नकोत!''

''ऑथा, तुमचं म्हणणं काय आहे?''

''मला स्वत:करता असं काहीच नको आहे. देशाकरता काही मागायचं म्हटल्यास आपल्याला ते फार वाटेल म्हणून मी काहीच मागत नाही.'' ऑथा उत्तरला.

माझारीनने हाच प्रश्न बाकीच्या तिघांना विचारला तेव्हा अरामी म्हणाला, ''लोकप्रतिनिधींच्या मागण्या राणीपुढे मांडण्यात आल्या आहेत. त्या सर्वांना मान्यता मिळाली पाहिजे!''

''ही गोष्ट ठरल्याप्रमाणे आहे. तुमचं असं काही मागणं असल्यास सांगा!'' माझारीन म्हणाला. अरामीने तत्काळ नार्मंडीची जहागीर मागितली. डार्टाने शिलेदारांचा पुढारी म्हणून नेमणूक करून घेतली. पार्थाने सरदारकीचा हुद्दा पैदा केला. हे सारे झाल्यानंतर माझारीन हळूच म्हणाला, ''ठीक आहे, तुम्ही आपापल्यापुरतं मागून घेतलंत. लोकांच्या मागण्यांचं आता मी पाहून घेईन.''

''वाऽ वाऽऽ'' अरामी म्हणाला, ''लोकांच्याशीही योग्य तो तह झालाच पाहिजे. हा पाहा मी त्याचा मसुदा आणलाच आहे. महाराजांनी त्यावर सही करावी.''

''मी त्यावर सही करण्याचं नाकारलं तर?'' माझारीन जोराने म्हणाला.

''पुढले परिणाम भोगायला तयार व्हावं!'' तितक्याच जोराने डार्टा म्हणाला.

''माझ्या सहीला राणीने हरकत घेतली तर?''

''त्याला मजजवळ पुष्कळ युक्त्या आहेत.'' डार्टा म्हणाला. ''रुईच्या किल्ल्यातील आपला खजिना राणीसाहेबांना मिळताच त्या कशावरही सही करतील. त्यांना आज पैशाची फार नड आहे!''

''पुरे पुरे. आणा तो तहाचा मसुदा इकडे!'' अरामीने तत्काळ कागद पुढे केला व माझारीनने काहीही आढेवेढे न घेता तत्काळ त्यावर सही केली. तत्काळ डार्टा सेंटजर्मेनला राणीकडे जाण्यास निघाला.

माझारीन नाहीसा झाल्याची वार्ता राणीला कळली होतीच. तिने त्याच्या शोधार्थ माणसे रवाना केली होती. डार्टा अकस्मात् एक दिवस राणीपुढे येऊन उभा राहिला व त्याने राणीची जिज्ञासा तृप्त केली. डार्टाचा हा बेडरपणा पाहून राणी थक्क झाली. डार्टाची हकीकत ऐकून होताच ती म्हणाली.

''तुम्ही स्वत:च्या अपराधांची यादी मजपुढे वाचीत आहा ह्याबद्दल तुम्हाला काही वाटत नाही? तुम्हाला इथल्या

इथे कैद करून मी प्रधानांची मुक्तता करायला सैन्य रवाना करते!''

''सरकार असला अविचार करणार नाहीत अशी मला खात्री आहे. कारण ह्याचा परिणाम भयंकर होणार आहे. त्यांची मुक्तता होण्याच्या आतच त्यांची जगातून कायमची मुक्तता होईल! आपण असा काही अविचार करू नये असा खुद्द माझारीनचा आपल्याला निरोप आहे!'' डार्टा शांतपणाने म्हणाला.

''ठीक आहे. मी तुम्हाला एकट्यालाच येथे कैद करून ठेवीन!''

''माझ्या मित्रांनी ह्याही गोष्टीचा नीट विचार केला आहे. मी ठराविक वेळात जर परत गेलो नाही तर माझारीनना पारीसच्या लोकांच्या हाती देण्याचा त्यांचा निश्चय आहे.'' डार्टा गंभीरपणाने म्हणाला. त्याच्या ह्या बोलण्याने राणी चांगलीच गोंधळून गेली. शेवटी ती निर्वाणीने म्हणाली, ''फ्रान्सच्या राणीला तुम्ही धाक दाखवीत आहा!''

''निरुपायाने ही गोष्ट करणं भाग आहे. माझ्या निष्ठेबद्दल सरकारना शंका असण्याचं मुळीच कारण नाही. जनतेचं उपाशी पोट सरकारच्या नजरेला आणावं एवढाच हेतू आहे ह्यात! सरकार, लोकांच्याकडे एकवार पाहा! त्यांना प्रेम द्या! सर्व सर्व तंटे एका क्षणात मिटतील!!''

''तुमचं काय म्हणणं आहे?''

डार्टाने माझारीनच्या सहीचा कागद राणीच्या हाती दिला. त्यावर सही करताना फ्रान्सच्या मानी राणीला रडू कोसळले. तिची मनस्थिती ध्यानात येताच डार्टाने झटकन् कागद परत घेतला व तो नम्रपणे म्हणाला, ''ह्यावर सही करण्यात राणीसरकारना दु:ख होत असेल तर मला तसा आग्रह धरायचा नाही. मी माझारीनना तसेच राणीसरकारपाशी हजर करीत आहे.'' डार्टा परत फिरताच राणीला उचंबळून आले. डार्टाला परत हाक मारून तिने त्या कागदावर सही केली व कागद डार्टाच्या हाती परत देत ती म्हणाली, ''मी ही सनद तुम्हाला खुशीने देत आहे. जा, माझ्या प्रजेला खूश करा नि माझारीनला परत पाठवून द्या!''

अत्यानंदाने राणीला मुजरा करून डार्टा बाहेर पडला. थोड्याच दिवसांत राणीसुद्धा सर्व दरबारी मंडळी सेंटजर्मेनहून पारीसला परत आली.

डार्टाला राणीने राजाच्या खास तैनातीला देऊन म्हटले, ''खरोखर मी आपल्याला कधीही विसरणार नाही.''

●●●